# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 30th September 2024 ( No. of Pages 24 ) ( No : 13

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ

## उच्च शिक्षण विभागाच्या भारतीय संविधान विरोधी वर्तनाचा

# निषेध विशेषांक

हा निषेध विशेषांक महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे सर्व घटक संघटनांच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे.

**डॉ.एस.पी.लवांडे**, *अध्यक्ष* **डॉ.पी.बी.रघुवंशी**, *सरचिटणीस*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)

***भारतीय संविधानातील तरतुदींची मोडतोड करणे, संविधानातील खंड २५४ चा भंग करणे व अखंडपणे तसे करीतच राहणे, मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा उघडउघड अवमान करणे***

***यासाठी***

***चंद्रकांतदादा पाटील साहेब, आपले विकासचंद्र रस्तोगी साहेब व आपले उच्च शिक्षण संचालक साहेब एक टोळी म्हणून काम करीत आहेत काय?***

*(पृष्ठ १९८ वरील परिच्छेद १६.४१ ते १६.५२ व परिशिष्ट एक पहा)*

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक ७ जुलै २०२४ रोजीच्या बैठकीत संमत झालेला ठराव*

# भारतीय संविधानामध्ये अधिकृतपणे बदल न करता "घरगुती पद्धतीने बदल" करून संविधानातील तरतुदींचा गैरवापर करणाऱ्या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

**एक :** सध्या भारतभर संविधानामध्ये बदल करण्याच्या प्रयत्नाबद्दल चर्चा सुरू आहे. मात्र अशी चर्चा होत असतांना महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने घटनेतील अनेक तरतुदींमध्ये "घरगुती पद्धतीने बदल" करून त्या तरतुदींचा वापर करण्याचा जो महान कर्तृत्वशाली 'उद्योग' सुरू केलेला आहे त्याकडे मात्र सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे.

**(i)** भारतीय संविधानातील कलम २५४ मध्ये कोणताही बदल झालेला नसतांना "घरगुती पद्धतीने त्यामध्ये बदल" करून त्या कलमाचा वापर उच्च शिक्षण विभागाने केलेला आहे व तसाच वापर करण्याचे निरंतरपणे सुरू ठेवलेले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने संविधानातील अनुच्छेद २५४ चा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनशी विसंगत राज्यशासनाचा कायदा किंवा राज्याचा शासननिर्णय अस्तित्वात राहू शकत नाही. हा तो अर्थ. मा.सर्वोच्च न्यायालयाने ही अंतिम स्थिती ठरवून दिल्यानंतर **महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने ती मान्य केली व राज्याच्या कायद्यामध्ये असलेली विसंगती दूर करणारे कायदेबदल केले व रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व मान्य केले. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी मा.सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय मानायला तयार नाहीत व शासननिर्णयातील तरतुदी दुरुस्त करायला तयार नाहीत आणि त्यांनी आपली अरेरावी तशीच चालू ठेवली आहे.**

**(ii)** मा.उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांची अवहेलना करण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणात या विभागाने सुरू केलेला असून तो तसाच सुरू ठेवलेला आहे. "शिक्षकांचे ७१ दिवसांचे बेकायदेशीरपणे कापलेले वेतन त्यांना परत करा व विलंबाने परत केल्याबद्दल त्यावर ८ टक्के दराने व्याज द्या" असा मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला. मा.सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय 'कन्फर्म' केला. महाराष्ट्र शासनाने ती गोष्ट मान्य करून त्याप्रमाणे शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित *(8/21)* केला. मात्र उच्च शिक्षण संचालकांनी, आपल्या सहसंचालकांना दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी आदेश *(10/21)* दिला, त्यामधून ८ टक्के व्याजाचा भाग संपूर्णपणे वगळून टाकला. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये बदल करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने फक्त मा.सर्वोच्च न्यायालयालाच दिलेला आहे ही वस्तुस्थिती असतांना या संचालकांनी घरगुती पद्धतीने घटना दुरुस्त करून हा अधिकार आपल्याकडे घेतला. त्याचबरोबर शासननिर्णयामध्ये दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढे सुद्धा त्यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळे त्या ८ टक्के व्याजाच्या रक्कमेची अंमलबजावणी पूर्णतः झालेली नाही.**

**(iii)** उच्च शिक्षण संचालकांच्या या बेढब वर्तनामुळे अवमान याचिकेच्या नोटीसा देण्यात आल्यावर उच्च शिक्षण सचिवांनी कानउघडणी केल्यावर मूळ निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांनी पुन्हा दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजीचे आदेश *(286/22)* काढतांना आपल्या आदेशात उच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करतांना त्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचा असंवैधानिक प्रकार महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये प्रथमच घडला. **मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करतांना त्यातील शब्द गाळून टाकण्याचा या देशाच्या घटनेने आपल्याला अधिकार दिलेला नाही एवढेसुद्धा त्यांच्या लक्षात आले नाही.**

**(iv)** एका उच्च शिक्षण सहसंचालकांनी तर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगनादेश दिला. **असा स्थगनादेश देण्याचा अधिकार भारतीय संविधानातील तरतुदीनुसार फक्त मा.सर्वोच्च न्यायालयाला आहे. याची जाणीव असतांना सुद्धा मा.सर्वोच्च न्यायालयाचा हा अधिकार त्या सहसंचालकांनी वापरला.**

**(v)** मा.उच्च न्यायालयासमोर व सर्वोच्च न्यायालयासमोर खोटी शपथपत्रे दाखल करणे ही तर उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची घटनेचा भंग करणारी व निरंतरपणे चालत असलेली कृती म्हणून सांगता येईल.

**दोन :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी एक पत्र *(4/21)* पाठवून "मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे आपले घटनात्मक कर्तव्य आहे व घटनेतील तरतुदींचे पालन करण्याची शपथ घेऊन आपण मंत्रिपद स्वीकारलेले आहे" असे मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना कळविले होते. ते पुढीलप्रमाणे :-

"It is a constitutional duty of the Minister to implement the High Court and the Supreme Court's Orders faithfully in as much as he has entered the office of a minister after taking an oath to bear true faith and allegiance to the Constitution of India as by law established."

**तीन :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने २१ जानेवारी २०२४ रोजी एक तपशीलवार ठराव संमत करून ह्या सर्व गोष्टी विद्यमान मा.उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिल्या. मात्र त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी

***घटनात्मक कर्तव्याचे पालन करण्यात श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी कसूर केल्याचे स्पष्ट झालेले असल्याने भारतीय संविधानातील कलम १६४ (३) अन्वये घटनात्मक कर्तव्याचे पालन करण्याबाबत मा.राज्यपालांनी दिलेल्या शपथेनुसार वर्तन त्यांनी न केल्यामुळे भारतीय संविधानाच्या कलम १६४ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मा.राज्यपालांनी त्यांना बडतर्फ करावे अशी मागणी करण्यात येत आहे.***

*(ठरावाचा परिच्छेद पाच पहा)*

**शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्रीपदी आरुढ झालेले आहेत. पण त्यांनी याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही.**

**चार :** संविधानातील तरतुदींमध्ये "घरगुती पद्धतीने बदल" करून वापरणे, संविधानात बदल करण्याचा आपल्याला अधिकार आहे असे समजून 'कारभार' करणे, मा.उच्च न्यायालयामध्ये व सर्वोच्च न्यायालयामध्ये खोटी शपथपत्रे दाखल करणे, उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत मुख्य सचिवांच्या दिनांक २० ऑक्टोबर २०१४ रोजीच्या आदेशाचे (219/21), वित्त सचिवांच्या दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या आदेशाचे (219/21), विधी सचिवांच्या दिनांक २ एप्रिल २०१४ रोजीच्या आदेशाचे (218/21) पालन न करणे व त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे व त्याची अवहेलना करणे, या सर्व बाबींची मा.उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्ती मार्फत चौकशी करण्यात यावी व **यासाठी जबाबदार असलेल्या उच्च शिक्षण विभागातील व उच्च शिक्षण संचालनालयातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

**पाच :** घटनेने ज्या गोष्टी बंधनकारक केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी त्या पद्धतीने न होणे हे घटनाबाह्य कृत्य होय. अशा परिस्थितीत घटनाबाह्य कृत्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना चाप लावणे, त्यांच्यावर कारवाई करणे, त्यांचा बंदोबस्त करणे ही त्या विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या मंत्र्यांची जबाबदारी असते. तेसुद्धा घटनेप्रमाणेच. प्रत्येक मंत्र्यांनी आपले पद धारण करण्यापूर्वी घटनेचे पालन करण्याबाबतची शपथ घेतली पाहिजे असे बंधन भारतीय संविधानानेच घालून दिलेले आहे. ही शपथ कोणत्या शब्दात घेतली पाहिजे हेही संविधानानेच निश्चित करून दिलेले आहे. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्री म्हणून समाविष्ट होत असतांना घ्यावयाच्या शपथेची शब्दरचना पाचव्या क्रमांकावर समाविष्ट आहे. त्या शपथेमधील "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" ही शब्दरचना तर महत्त्वाची आहेच पण त्याच बरोबर "**राज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व शुद्धबुद्धीने पार पाडीन आणि संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" हीही शब्दरचना महत्त्वाची आहे. उपरोक्त प्रमाणे शपथ घेऊनच श्री.चंद्रकांतदादा पाटील हे उच्च शिक्षणमंत्री पदावर आरुढ झालेले आहेत. आपल्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातला आहे त्याकडे सतत कानाडोळा करणे, सहा महिन्यापूर्वी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने "डझनावारी प्रकरणांमध्ये तुमचे अधिकारी घटनाबाह्य वर्तन करीत आहेत" ही गोष्ट उदाहरणासह त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्याकडे डोळेझाक करण्याच्या वर्तनातून शपथबद्ध असलेल्या घटनात्मक कर्तव्याचे पालन करण्यात श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी कसूर केल्याचे स्पष्ट झालेले असल्याने भारतीय संविधानातील अनुच्छेद १६४ (३) अन्वये घटनात्मक कर्तव्याचे पालन करण्याबाबत मा.राज्यपालांनी दिलेल्या शपथेनुसार वर्तन त्यांनी न केल्यामुळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा **वापर करून मा.राज्यपालांनी त्यांना बडतर्फ करावे अशी मागणी करण्यात येत आहे.**

**सहा :** माजी विधानपरिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष व या कार्यकारी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य, प्रा.बी.टी.देशमुख यांनी दिनांक २४ जून २०२४ रोजी मा.मुख्यमंत्र्यांना एक निवेदन पाठवून एका मागून एक अनेक प्रकरणात घटनेतील तरतुदींची मोडतोड करून त्या तरतुदींचा वापर करण्याचे अनेक अभद्र प्रकार मा.मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिलेले आहेत. याच पत्रात "महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करून आपण मार्ग काढावा" अशीही विनंती मा.मुख्यमंत्र्यांना केली. पण याबाबतीत कोणतीही कारवाई झाली नाही. उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुरू केलेला **भारतीय संविधानातील तरतुदींच्या मोडतोडीचा अभद्र प्रकार हा सहन करण्याच्या पलीकडे गेलेला असून महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये त्यामुळे मोठेच असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे आणि म्हणूनच या अभद्र प्रकाराला विरोध करण्यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

### *आंदोलनाचा कार्यक्रम*

**सात : (१)** यापूर्वी प्रकाशित करण्यात आलेल्या आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित करण्यात आलेले साहित्य सोडून या ठरावासह या विषयाशी संबंधित महत्त्वपूर्ण कागदपत्रे समाविष्ट असलेला दुसरा विशेषांक दिनांक १५ जुलै २०२४ पावेतो घटक संघटनांच्या मार्फत प्रकाशित करण्यात येईल.

**(२)** पुढील १५ दिवसात राज्यस्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हा स्तरावरील लोकप्रतिनिधींशी संघटनेचे प्रतिनिधीमंडळ चर्चा आयोजित करून संघटनेचे म्हणणे त्यांच्या कानावर घालतील. सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या सर्वच लोकप्रतिनिधींना आंदोलनाशी संबंधित मुद्रित साहित्याच्या प्रती प्रत्यक्ष भेट घेऊन दिल्या जातील.

**(३)** सोमवार, दिनांक २२ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने मुंबई येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात येईल. या पत्रकार परिषदेतून महासंघाचे अध्यक्ष व मुंबई येथील संलग्नित घटक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहून महासंघाची भूमिका सर्व कागदपत्रांसह सादर करतील. तसेच मंगळवार, दिनांक २३ जुलै २०२४ रोजी घटक संघटनांनी आपआपल्या परिक्षेत्रामध्ये पत्रकार परिषदा घेऊन महासंघाच्या भूमिकेबाबत त्या त्या ठिकाणचे पदाधिकारी परिषदेला संबोधित करतील.

**(४)** भारतीय संविधानातील तरतुदींची पायमल्ली करून उच्च शिक्षण विभागाने उच्च शिक्षण क्षेत्रातील भरती प्रक्रिया पूर्णपणे गैरकायदेशीररीत्या थांबविली आहे. शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी उच्च गुणवत्ता धारण करणाऱ्या शेकडो युवक युवतींना घटनाबाह्य पद्धतीने या पदांपासून वंचित केलेले आहे. उच्च शिक्षण विभागाचे हे कृत्य भारतीय संविधानातील कलम २५४ चा भंग करणारे असून आरक्षण उध्वस्त करणारे आहे. याबाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करणारे आहे. त्याचबरोबर मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने याबाबतीत घेतलेल्या निर्णयाच्या ते विरोधात आहे. उच्च शिक्षण विभागाच्या या कृत्यामुळे विपरितरीत्या प्रभावित होणाऱ्या तरुण-तरुणींचे विद्यापीठनिहाय मेळावे दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत आयोजित केल्या जातील.

**(५)** सर्व घटक संघटनांच्या वतीने त्या त्या क्षेत्रात आंदोलनाविषयी माहिती देण्यासाठीचे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत केल्या जाईल.

**(६)** शुक्रवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी सर्व विद्यापीठांवर मोर्चाचे आयोजन केले जाईल व उच्च शिक्षण विभागाच्या दबावाखाली मा.कुलगुरुंनी काढलेले आदेश हे भारतीय संविधानाच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात आहेत याची मा.कुलगुरुंना जाणीव करून दिली जाईल. सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंनी आपआपल्या पदव्युत्तर विधी विभागाच्या तज्ज्ञांशी चर्चा करून घटनेच्या विरोधातील वर्तन दुरुस्त करावे अशी त्यांना विनंती करण्यात येईल. ही विनंती मान्य न झाल्यास त्या दिवसापासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विद्यापीठांमार्फत संचालित केलेल्या जाणाऱ्या परीक्षांच्या कामाशी संपूर्णपणे असहकार पुकारतील याचीही त्यांना जाणीव करून दिली जाईल.

**(७)** दिनांक १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत राज्यस्तरावर याबाबतीत कोणतीही कारवाई न झाल्यास दिनांक १७ ऑगस्ट २०२४ पासून राज्य मंत्रीमंडळातील कोणत्याही मंत्र्यांनी जिल्ह्याच्या ठिकाणी आयोजित केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या स्थळी शांततापूर्ण मार्गाने निदर्शनांचे आयोजन करण्यात येईल.

**(८)** इतक्या उपर उच्च शिक्षण विभागाच्या वर्तनामध्ये सुधारणा न झाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. हे बेमुदत कामबंद आंदोलन कोणत्या तारखेपासून सुरू होईल याबाबतची तारीख जाहिर करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना देण्यात येत आहेत.

**(९)** विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासून त्या त्या घटक संघटनांच्या वतीने तालुकानिहाय बैठकांचे आयोजन केल्या जाईल व या बैठकांमध्ये उच्च शिक्षण विभागाच्या घटनाबाह्य वर्तनाचे तसेच मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करणाऱ्या कृत्याचे तपशील या सभांमधून समजावून सांगण्यात येतील.

*****

**प्रा.बी.टी.देशमुख,**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालय रोड, अमरावती - ४४४ ६०४

मो.नं. ९८९०९०९७०१ E-mail ID : btdeshmukh@rediffmail.com

***दिनांक :- २४ जून २०२४***

प्रति,

**मा.एकनाथजी शिंदे,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**विषय :** "घरगुती पद्धतीने घटनाबदल" करून त्याप्रमाणे वापर करण्याच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या घटनाबाह्य वर्तनाला आळा घालण्याबाबत.

मा.महोदय,

**एक :** महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री या नात्याने आपण दिनांक ४ जून २०२४ रोजी "**आम्ही संविधान बदलणार म्हणून विरोधकांनी अपप्रचार करीत संभ्रम निर्माण केला. आम्ही संभ्रम दूर करण्यात कमी पडलो.**" असे पत्रकार परिषदेत सांगितले. बुधवार, दिनांक ५ जून २०२४ रोजीच्या अनेक वृत्तपत्रांमध्ये "**संविधान बदलविण्याचा अपप्रचार रोखण्यास आम्ही कमी पडलो आहे - मुख्यमंत्री**" अशा मथळ्याखाली हा वृत्तांत अनेक वृत्तपत्रांमध्ये छापून आला. त्या दिवशी व पुढच्या दोन दिवसात अनेक दूरचित्रवाहिन्यांवरून अशाच प्रकारचे मत आपण व्यक्त केल्याचे सर्वांनी पाहिलेले आहे. "**विरोधकांनी संभ्रम निर्माण केला**" असे मा.मुख्यमंत्री म्हणत आहेत. "**हा संभ्रम दूर करण्यात आम्ही कमी पडलो**" असेही ते म्हणत आहेत. विरोधकांनी खरोखरच संभ्रम निर्माण केला असेल तर तो दूर करता येईल. पण **ती वस्तुस्थिती असेल तर वस्तुस्थितीला संभ्रम म्हणून दूर करणे हे कसे शक्य आहे?**

**दोन :** पंतप्रधानांच्या **आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष बिबेक देबरॉय** यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजीच्या एका इंग्रजी दैनिकात तपशीलवार लेख लिहून भारतीय संविधानाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केलेली आहेत. राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांविषयीचे त्यांच्या लेखातील प्रतिपादन हे तर अत्यंत भयसूचक आहे. "If reforms are about markets and a refocused and reduced role for government, what sense do we make of the Directive Principles of State Policy?" असे विचार त्यांनी मांडलेले आहेत. "प्रगती किंवा सुधारणा (reforms) म्हणजे शेअर बाजाराची प्रगती हे जर आपले ठरलेले आहे. त्याबाबतीत शासनाला नगण्य भूमिका पार पाडायची असेल तर मग राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्त्वांना काय अर्थ आहे?" अशी ही विचारसरणी आहे. केशवानंद भारती खटल्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिल्याप्रमाणे घटनेच्या मूळ संरचनेच्या (Basic Structure) विरोधात जाईल असा बदल करता येत नाही. श्री.बिबेक देबरॉय या लेखात असे मत मांडतात की, घटनेत दुरुस्ती केली आणि ती मूळ घटनेच्या विरोधात असेल तर सर्वोच्च न्यायालय ती घटनादुरुस्ती रद्दबातल करू शकते म्हणून आपण नवीन घटना तयार करणेच जास्त योग्य होईल. त्यांच्या लेखाचा मथळाच मुळात "There is a case for 'we the people' to embrace a new Constitution" असा आहे आणि या लेखात पुढे त्यांनी "We the People have to give ourselves a new Constitution" असे प्रतिपादन केलेले आहे.

**तीन :** महाराष्ट्रात एकट्या उच्च शिक्षण विभागामध्ये घटनेतील तरतुदी बदलवून वापरण्यात आल्याची डझनावारी प्रकरणे प्रत्यक्षात घडून गेलेली आहेत व आजही घडत आहेत. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजी ११८ परिच्छेदांचा एक तपशीलवार प्रस्ताव मंजूर करून ही बाब मा.उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली. मात्र त्यांनी याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही. "**विधिवतरीत्या घटना बदलविणे**" हा वेगळा भाग आहे. पण तसे न करता "**घरगुती पद्धतीने घटनाबदल**" करून असंख्य प्रकरणात बदलविलेल्या तरतुदींचा वापर करणे हा निश्चितच लाजिरवाणा व लांच्छनास्पद असा पोरकटपणाचा प्रकार आहे. मा.मुख्यमंत्र्यांना ही माहिती दिल्या गेली नाही असे गृहित धरून त्यातील काही ठळक बाबी आपल्या लक्षात आणून देण्याचे मी योजिले आहे.

## (१)

**१.** भारतीय संविधान अस्तित्वात आले त्या दिवसापासून "**Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions.**" हा विषय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये समाविष्ट आहे. (Entry 66 in the Union List i.e. List I of Seventh Schedule of the Constitution of India.) केंद्र सूचित असलेल्या विषयाबाबत विधिविधानाचे अधिकार हे संसदेलाच (म्हणजे केंद्रशासनाला) असतील अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणे:- "**246.** ..... Parliament has exclusive power to make laws with respect to any of the matters enumerated in List I in the Seventh Schedule in the Constitution referred to as the "Union List". संविधानाने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "**विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६**" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिकारांचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने पारित केलेले "**UGC REGULATIONS 2018**" हे अंमलात आले असून ते "The Gazette of India Extraordinary : Part III : Section 4" मध्ये दिनांक १८ जुलै २०१८ रोजी प्रकाशित झालेले आहेत. "**UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges and measures for the maintenance of standards in Higher Education, 2018**" असा त्याचा मथळा आहे. *(यापुढे उल्लेख 'रेग्युलेशन' असा)*

**१.१** "Education, including technical education, medical education and universities," हा विषय भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टात समवर्ती सूची या तिसऱ्या सूचीमध्ये २५ व्या क्रमांकावर समाविष्ट आहे. समवर्ती सूचीतील विषयावर कायदे करण्याचा व कारभार करण्याचा अधिकार केंद्रशासन व राज्यशासन या दोघांनाही असेल, मात्र दोहोंमध्ये विसंगती निर्माण झाल्यास संविधानाच्या खंड २५४ मधील व्यवस्था लागू होईल. हे कलम २५४ पुढीलप्रमाणे :-

"**254. (1)** If any provision of a law made by the Legislature of a State is repugnant to any provision of a law made by Parliament which Parliament is competent to enact, or to any provision of an existing law with respect to one of the matters enumerated in the Concurrent List, then, subject to the provisions of clause (2), the law made by Parliament, whether passed before or after the law made by the Legislature of such State, or, as the case may be, the existing law, shall prevail and the **law made by the Legislature of the State shall, to the extent of the repugnancy, be void.**"

**१.२** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी याबाबतची स्थिती स्पष्ट केलेली आहे. दिनांक ३ मार्च २०२२ रोजी **Writ Petition (Civil) No.1525 of 2019; Gambhirdan K Gadhvi VERSUS The State of Gujarat & Ors.** या प्रकरणी राज्यशासनांसाठी व विद्यापीठांसाठी यूजीसी रेग्युलेशनबाबतची सांवैधिक स्थिती स्पष्ट करणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. गुजरात राज्यशासनाचा कायदा (सरदार पटेल युनिर्व्हसिटी ॲक्ट, १९५५) व विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यामध्ये विसंगती असेल तर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समधील तरतुदी वरचढ ठरतील व त्याप्रमाणे कारवाई करावी लागेल, राज्यशासनाच्या कायद्यातील अशा तरतुदी प्रतिकुलतेच्या व्याप्ती पुरत्या शून्य होतील, अशाप्रकारचा स्पष्ट निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे. **गुजरात प्रकरणी दिलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयात पुढीलप्रमाणे "कायद्याचा अंतिम शब्द" निश्चित करून दिला आहे.**:-

**(i)** राज्यसरकार आणि त्या राज्यातील विद्यापीठे यांना विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१० व २०१८ यांचे पालन करणे बंधनकारक आहे, असे स्पष्टपणे या निर्णयाच्या परिच्छेद ११.४ मध्ये नमूद करण्यात आलेले

आहे. ते पुढील शब्दात :- “Therefore, the State of Gujarat and the universities thereunder including the SP University are bound to follow UGC Regulations, 2010 and UGC Regulations, 2018.”

**(ii)** राज्यशासनाच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदी ह्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सच्या विरोधात आहेत असे स्पष्टपणे या निर्णयात नमूद आहे आणि राज्यशासनावर व राज्यातील विद्यापीठांवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स हे बंधनकारक आहेत असेही या निर्णयाच्या परिच्छेद १२.२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- “Thus, the provisions of the SPU Act, 1955/provisions under the State legislation are just contrary to the UGC Regulations, 2010/2018, which, as observed hereinabove, are binding on the State Government and the universities thereunder.”

**(iii)** कुलगुरुंची ही नेमणूक विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१८ च्या विरोधात आहे असे आमच्या लक्षात आले आहे असे या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात:- “Thus, we find that the appointment of respondent No.4 is contrary to the UGC Regulations, 2018.”

**(iv)** सरदार पटेल विद्यापीठाच्या कुलगुरुंची नेमणूक ही विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१८ चा भंग करून करण्यात आलेली आहे त्यामुळे ही नेमणूक रद्दबातल ठरविण्यात येत आहे, असे या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे. :- “Therefore, when the appointment of respondent No.4 is found to be contrary to the UGC Regulations, 2018 and the UGC Regulations are having the statutory force, we are of the opinion that this is a fit case to issue a writ of quo warranto and to quash and set aside the appointment of respondent No.4 as the Vice Chancellor of the SP University.”

**(v)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स आणि राज्याच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदी यामध्ये विसंगती असेल तर घटनेच्या कलम २५४ नुसार रेग्युलेशन्सप्रमाणे कारवाई करावी लागेल असेही या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- “UGC Regulation becomes part of the Act. In case of any conflict between State legislation and Central legislation, Central legislation shall prevail by applying the rule/principle of repugnancy as enunciated in Article 254 of the Constitution as the subject ‘education’ is in the Concurrent List (List III) of the Seventh Schedule of the Constitution.”

**१.३** भारतीय संविधानातील कलम २५४ हे “विधिवतरीत्या घटनाबदल” करून दुरुस्त करण्यात आलेले नसले तरी ते “घरगुती पद्धतीने घटनाबदल” करून वापरण्याचा आम्हाला अधिकार आहे असा पोरकटपणाचा हट्ट उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी धरला आहे. यूजीसी रेग्युलेशनच्या विरोधातील तरतुदी राज्यशासनाच्या कायद्यात असतील किंवा राज्याच्या शासननिर्णयात असतील तर त्या जीवंत राहू शकत नाहीत ही यूजीसी रेग्युलेशनची वरिष्ठता महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेली असली तरी, देशाच्या कायद्यामध्ये तशी तरतूद (कलम २५४) असली तरी, मा.सर्वोच्च न्यायालयाने हा अर्थ स्पष्ट केलेला असला तरी, ते आमच्यावर बंधनकारक नाही अशा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या मनात असलेल्या लहान-मोठ्या पोरकटपणाच्या अनेक कल्पना या ‘थोरल्या’ पोरकटपणामध्ये समाविष्ट आहेत.

**१.४** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. “**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**” अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. “**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**” अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (२)

**२.१** गुजरात मधील प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त निर्णय दिल्यानंतर राज्यशासनाच्या शासननिर्णयातील तरतुदी तर सोडाच, पण राज्यशासनाच्या कायद्यातील तरतुदी या रेग्युलेशनच्या विरोधात असतील तर त्या जिवंत राहू शकणार नाहीत, ही गोष्ट लक्षात आल्याने अनेक राज्यांमध्ये कुलगुरुंच्या नेमणुका एकामागोमाग रद्द होवू लागल्या. महाराष्ट्र शासनाने याबाबतीत कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांची निवड समिती व पात्रता याबाबत विद्यापीठ कायद्यात असलेल्या तरतुदी रेग्युलेशनशी विसंगत असल्यामुळे त्या दुरुस्त करून रेग्युलेशनशी सुसंगत करण्याचा निर्णय घेतला. अनेक ठिकाणी कुलगुरुंच्या नेमणुका होऊ घातलेल्या असल्यामुळे महाराष्ट्र शासनाला ही बाब स्वाभाविकपणे निकडीची वाटली व ताबडतोब कायद्यात दुरुस्ती करणारा सन २०२२ चा महाराष्ट्राचा अध्यादेश क्रमांक १३ काढण्यात आला. हा अध्यादेश गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ च्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग ८ मध्ये प्रकाशित करण्यात आला असून त्या अध्यादेशाच्या उद्देशपत्रिकेतील परिच्छेद ३, ४ व ५ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे. :-

“3. **The Supreme Court has recently in the cases of Gambhirdan K Gadhvi v/s State of Gujarat & Ors. (Writ Petition (Civil) No. 1525 of 2019) and Professor (Dr.) Sreejith P.S. v/s Dr. Rajasree M.S.& Ors. (Civil Appeal Nos. 7634-7635 of 2022), held** that the eligibility criteria and appointment of Vice-Chancellor shall be always as per the relevant **UGC Regulations and the State Act if not on a par with the UGC Regulations must be amended to bring it on a par with the applicable UGC Regulations and until then it is the applicable UGC Regulations that shall prevail.**

4. The terms of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors of certain universities in the State have already expired and new appointments are due.

5. In view of above, the existing provisions regarding appointments of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors contained in the said **State Acts relating to universities needs to be amended suitably so as to make them in consonance with the UGC Regulations.”** या अध्यादेशाचे आता अधिनियमामध्ये रूपांतर झाले असून सन २०२३ चा महाराष्ट्राचा अधिनियम क्रमांक ६ असे त्याचे क्रमांकन झाले आहे. (22/2023) हा अधिनियम दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग क्रमांक ६ मध्ये प्रसृत करण्यात आला आहे.

**२.१** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ८ मार्च २०१९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१८ च्या रेग्युलेशनची अंमलबजावणी करणारा शासननिर्णय (No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1) निर्गमित केला. *(यापुढे उल्लेख **‘शासननिर्णय’** असा)* या शासननिर्णयात अनेक तरतुदी या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनशी विसंगत आहेत. भारतीय संविधानाच्या कलम २५४ चा सतत होत असलेला भंग व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची सतत होणारी अवहेलना करण्याचा उच्च शिक्षण विभागाकडून होत असलेला अपराध टाळण्याच्या दृष्टीने संविधानातील तरतुदीशी सुसंगत व सर्वोच्च न्यायालयाने कायद्याचा निश्चित केलेला अर्थ लक्षात घेता

“If any provision of a **Government Resolution** is repugnant to any provision of the UGC Regulations 2018 then the provision of **UGC Regulation 2018** shall prevail and provision in the Government Resolution shall, to the extent of the repugnancy, be void.” अशी तरतूद समाविष्ट असलेला शासननिर्णय ताबडतोबीने निर्गमित करण्यात यावा अशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार मागणी केली पण उच्च शिक्षण विभागातील अधिकारी आपला पोरकटपणाचा हट्ट सोडायला तयार नाहीत.

**२.३ मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व संविधानातील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सशी राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय विसंगत असू शकत नाही ही भूमिका महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे राज्याच्या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी ही भूमिका मान्य करायला तयार नसल्यामुळे शासननिर्णयातील विसंगत तरतुदी अजूनही**

**जिवंत आहेत** अशी ही स्थिती आहे. प्रत्यक्षात "**विधिवत घटनाबदल**" झालेला नसला तरी "**घरगुती पद्धतीने घटनाबदल**" करून आपल्याला संविधानातील कलम २५४ चा भंग करता येतो व असे करतांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्याचा आपल्याला अधिकार आहे असे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी गृहित धरले आहे.

**२.४** भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राज्यकारभाराच्या विषयांबाबत विधिविधान (Legislation including subordinate legislation) तयार करण्याचा अधिकार हा राज्याच्या मंत्रीमंडळाचा अधिकार आहे. "घटनेत विधिवत दुरुस्ती" न करता "घरगुती पद्धतीने घटनादुरुस्त" करून आम्ही हा अधिकार वापरू शकतो, असा पोरकटपणाचा हट्ट उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी धरला आहे.

**२.५** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (३)

**३.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समध्ये विद्यापीठातून व महाविद्यालयातून कंत्राटी भरती व कायमस्वरूपी भरती याबाबतचे काटेकोर नियम *(73/18)* ठरवून देण्यात आलेले आहेत. त्या नियमाप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या जागा १० टक्के पेक्षा जास्त असता कामा नये असे बंधनकारक केलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे:-

**"13.0 Appointments on Contract Basis :** The teachers should be appointed on contract basis only when it is absolutely necessary and when the student teacher ratio does not satisfy the laid-down norms. **In any case, the number of such appointments should not exceed 10% of the total number of faculty positions in a College/University.** The qualifications and selection procedure for appointing them should be the same as those applicable to a regularly-appointed teacher. **The fixed emoluments paid to such contract teachers should not be less than the monthly gross salary of a regularly appointed Assistant Professor.** Such appointments should not be made initially for more than one academic session, and the performance of any such entrant teacher should be reviewed for academic performance before reappointing him/her on contract basis for another session. Such appointments on contract basis may also be resorted to when absolutely necessary to fill vacancies arising due to maternity leave, child-care leave, etc."

**३.१ आज आता ९० टक्के जागा ह्या कायम तत्त्वावर भरल्याच पाहिजेत हा विद्यापीठ अनुदान आयोगाचा नियम ही सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली कायद्याची अंतिम सुस्थापित स्थिती आहे.** रेग्युलेशनने ठरवून दिल्याप्रमाणेच त्या कंत्राटी शिक्षकांना वेतन देण्यात यावे, तसे न करणे हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे.

**३.२** तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री मा.श्री.विनोद तावडे यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविले होते. या चर्चेचे अधिकृत कार्यवृत्त दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ रोजी महासंघाला देण्यात आले. त्यामध्ये शिक्षक भरतीबाबतचा उल्लेख शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**मा. मंत्री यांचे निर्देश** :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठविण्याबाबत शासनाच्या उच्चाधिकार समितीनेही सहमती दिली असून याबाबत शिक्षकेतरची १०० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली असून शिक्षकीय संवर्गाची ६० टक्के पदे भरायाला उच्च शिक्षण विभाग परवानगी मागत असून उरलेली ४० टक्के पदे तासिका तत्त्वावर भरण्यास तूर्त अनुमती मिळावी, ही तासिका तत्त्वावरील पदे भरतांना प्रत्येक अध्यापकास किमान १५ ते २० हजार मिळतील असे मानधन ठरविण्यात यावे. पुढील काळात ही पदे भरण्यात यावीत."

**३.४** मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी कबूल केल्याप्रमाणे दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ रोजी याबाबतचा शासननिर्णय *(137/18)* निघाला व त्यानुसार काही शिक्षक भरती झालीसुद्धा. ६० टक्के पदे भरण्याचा निर्णय तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी घेतला. त्यानंतर सांवैधानिक दृष्ट्या बऱ्याच महत्त्वपूर्ण घटना घडलेल्या आहेत. **एक म्हणजे** गंभिरदन गढवी प्रकरणाचा - रेग्युलेशनच्या बंधनकारकतेबाबतचा - मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय दिनांक ३ मार्च २०२२ रोजी आला. **दुसरे म्हणजे** विसंगती असल्यास राज्यशासनाचा कायदा दुरुस्त करण्याची भूमिका महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी मान्य करून वटहुकूम (Maharashtra Ordinane No. 13 of 2022) हा दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी काढला. **तिसरे असे की,** राज्याच्या मंत्रीमंडळाने ही भूमिका मान्य करून अधिनियम (सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ६) दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी प्रख्यापित केला. **त्यामुळे किमान ९० टक्के कायम शिक्षकांची भरती ही सर्वोच्च न्यायालय मान्य अशी कायद्याची सुस्थापित अंतिम स्थिती झालेली आहे. उपरोक्त तीन महत्त्वपूर्ण घटना घडल्यानंतर ९० टक्के जागा भरण्याचा निर्णय न घेणे हे पूर्णपणे घटनाबाह्य व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधातील कृत्य होय.**

**३.५** "विधिमय मार्गाने घटनादुरुस्ती" झालेली नसली तरी "घरगुती मार्गाने घटना दुरुस्त" झालेली आहे असे समजून वर्तन करण्याचा पोरकटपणाचा हट्ट धरण्याचा अधिकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना आहे असे त्यांनी गृहित धरले आहे. भारतीय संविधानाबाबत अशा पोरकट कल्पना मनाशी बाळगणाऱ्या अधिकाऱ्यांच्या एका पिढीला उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदासाठीची उच्च गुणवत्ता धारण करणाऱ्या युवकांच्या अनेक पिढ्या बरबाद करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे मी आपल्या लक्षात आणून देत आहे. मागासवर्गियांचा तिरस्कार करणाऱ्या उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी उत्तम गुणवत्ता प्राप्त मागासवर्गीय तरुणांना आरक्षणाच्या मार्गाने किंवा गुणवत्तेच्या मार्गाने या व्यवसायात येण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संविधानातील कलम २५४ चा भंग करण्याच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्याच्या म्हणजेच "घरगुती पद्धतीने घटनाबदल" करण्याच्या या मार्गाची निवड केलेली आहे ही बाबसुद्धा मी आपल्या लक्षात आणून देत आहे.

**३.६** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (४)

**४.१** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांचा आदेश केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २ नोव्हेंबर २०१७ रोजी सर्व राज्यांकडे पाठविला. या आदेशामध्ये "तुम्ही हा आदेश अंमलात आणला तर ५० टक्के भार केंद्रशासन सहन करील" असे नमूद आहे. त्याबाबतची सर्वात महत्त्वाची अट केंद्रशासनाच्या याच आदेशाच्या परिच्छेद 16. (h) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद होती :-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition **that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by Stale Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification** except in regard to the date of implementation and pay scales mentioned herein above." केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) **सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच**

**केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, अशी ही तरतूद आहे.**

**४.२** महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळासमोर केंद्राची ही सारी कागदपत्रे ठेवण्यात आलीत. दिनांक ५ मार्च २०१९ रोजी राज्य मंत्रीमंडळाने बैठक क्रमांक २१५ मध्ये या विषयावर घेतलेला निर्णय मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षाने अधिकृतपणे त्याच दिवशी जाहिर केला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**४.३** मंत्रीमंडळाच्या निर्णयाचा हा मसुदा काळजीपूर्वक वाचला तर त्यात पुढील निर्णय मंत्रीमंडळाने घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येते. (१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना थकबाकी अदा करण्यापोटी येणाऱ्या एकूण २५८४ कोटी ४७ लाख रुपयाच्या एकूण खर्चाला मान्यता देण्यात आलेली आहे. (२) हा खर्च केल्यावर त्यापैकी ५० टक्के रक्कम (म्हणजे जवळ जवळ तेराशे कोटी रुपये) केंद्रशासनाकडून अर्थसाहाय्य म्हणून मिळणार आहे. या बाबीलासुद्धा मंत्रीमंडळाने मान्यता दिली. केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, याची माहिती असतांना मंत्रीमंडळाने घेतलेला हा निर्णय आहे.

**४.४ उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी "समग्र योजना" बासनात गुंडाळून ठेवली व दिनांक ८ मार्च २०१९ रोजीचा शासननिर्णय निर्गमित केला. आपल्या सोईनुसार 'अर्थपूर्ण चर्चा' करण्याच्या अनेक संधी व 'लक्ष्मीदर्शनाची अनेक आवर्तने' काढण्याच्या सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या अनेक अटी 'लोकल प्रॉडक्शन'च्या स्वरूपात त्या शासननिर्णयामध्ये घुसाडल्या व 'नॅशनल प्रॉडक्शन' विद्रुप करून ठेवले.** केंद्रीय योजनेमध्ये आपल्या आवडीच्या अनेक

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग***

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

४ था मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०००३२

ई-मेल : vishi1-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२७९३१७४

तात्काळ

क्रमांक : संकिर्ण २२०४/प्र.क्र.९१/विशि-१

**दिनांक : २६ सप्टेंबर २०२४**

प्रति,

(१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे (२) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई (३) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (४) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (५) कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (६) कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (७) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर (८) कुलसचिव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (९) कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (१०) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (११) कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (१२) कुलसचिव, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई (१३) कुलसचिव, भारती विद्यापीठ, पुणे (१४) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय :** दिनांक ११ जुलै, २००९ पूर्वी एम.फील अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात समिती गठित करण्यात आल्याबाबत.

**संदर्भ :** (१) आपले पत्र क्रमांक उशिसं/२५३५.२०१२/अवि/विशि-१ दि.१४.८.२०२४ (२) उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र क्रमांक १०-१८/२०२४ (PS/Misc.) दि. १३ ऑगस्ट, २०२४ चे पत्र (३) समक्रमांकाचे दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ चे पत्र (४) उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र क्रमांक १०-१८/२०२४ (PS/Misc.) दि. ५ सप्टेंबर २०२४

विषयांकित प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. "दिनांक ११ जुलै, २००९ पूर्वी एम.फील ही पदवी धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण करण्यापासून सूट द्यावी," अशी विनंती विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात येत आहे. संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार राज्यातील १२ विद्यापीठांतील एकूण १४४७ अध्यापकांनी दिनांक ११ जुलै २००९ पर्यंत एम.फील ही पदवी प्राप्त केली असल्याचे दिसून आले आहे. अशा प्रकरणांची तपासणी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने तज्ज्ञांची समिती गठित केली असल्याचे आयोगाच्या संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये कळविण्यात आले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भ क्रमांक ४ येथील पत्रान्वये आता खालील माहिती मागविण्यात आली आहे. :-

(a) Appointment letters of the candidates highlighting the condition that the candidates appointed through duly constituted selection committee on or before 14th June, 2006.

(b) A certificate from the concerned institutions certifying the fulfillment of the above mentioned conditions.

(c) Consolidated list of candidates having information as per the prescribed enclosed format (Annexure - 1) duly certified by the competent officer of the Government of Maharashtra.

(d) In addition to that, particulars of candidates in consolidated form duly signed by the Competent Authority of Maharashtra State (Proforma enclosed)

उपरोक्त माहिती संचालक, उच्च शिक्षण यांनी समन्वय साधून विहित वेळेत आयोगास सादर केली जाईल, याची दक्षता घ्यावी.

**(सं.रा.उतेकर)**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सोबत :** यूजीसीचे दि. ५.९.२०२४ चे पत्र, सहपत्रांसह

**प्रत :** निवडनस्ती (विशि-१)

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

Ministry of Education, Govt. of India

Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002

www.ugc.gov.in Phone No. 011-23604425

Email/Speed Post

F.No.10-18/2024 (PS/Misc.)

**5th September 2024**

**Sh. Vikash Chandra Rastogi,**

Principal Secretary, Govt. of Maharashtra

409, Annex Bldg, Hutatma Rajguru Chowk,

Madame Cama Road, Mantralaya, Mumbai-400032

**Subject :** Exempting Teachers from NET, who have completed M.Phil Degree before 11.07.2009

Sir,

In reference to this office letter dated 13th August, 2024 on the subject cited above, I am directed to request you to provide the documents as mentioned under :

a. Appointment letters of the candidates highlighting the condition that the candidate appointed through duly constituted selection committee on or before 14th June, 2006.

b. A certificate from the concerned institutions certifying the fulfillment of the above mentioned conditions.

c. Consolidated list of candidates having information as per the prescribed enclosed format (Annexure - I) duly certified by the competent officer of the Government of Maharashtra.

In addition to that, it is also requested to submit the particulars of candidates in consolidated form duly signed by the Competent Authority of Maharashtra State (Proforma enclosed)

Yours Sincerely

**(Dr.Nikhil Kumar)**

Deputy Secretary

*Statement in respect of M.Phil candidates appointed for Under graduate Teaching only*

***(is not printed here)***

अटी घुसडल्या. एवढ्यावरच उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची बहादुरी संपत नाही. खरी बहादुरी त्यापुढे आहे. ही एवढी सारी योजनेची मोडतोड करून ५० टक्केचा केंद्रशासनाचा हिस्सा म्हणून जवळ जवळ १३२१ कोटी रुपयांचा निधी आणण्यात हे अधिकारी यशस्वी झाले ही खरी बहादुरी आहे. **केंद्रशासनाच्या अधिसूचनेमध्ये नमूद असलेली दोन पत्रे व दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यांची समग्र योजना म्हणून महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे, असे सांगून हा निधी आणण्याचा प्रकार एक घोर फसवणुकीचा प्रकार आहे. त्या समग्र योजनेतील अनेक अटींचा महाराष्ट्रात भंग करण्यात आला असून स्वतःच्या पदरच्या अनेक अटी अधिकाऱ्यांनी त्या शासननिर्णयामध्ये टाकल्या आहेत.**

**४.५** थोडक्यात सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, मंत्रीमंडळाने एकदा निर्णय घेतल्यावर शासननिर्णय निर्गमित करतांना परस्पर मंत्रीमंडळाच्या निर्णयात नसलेल्या बाबी शासननिर्णयात घुसडण्याचा किंवा मंत्रीमंडळाच्या निर्णयात असलेल्या बाबी शासननिर्णयातून वगळण्याचा अधिकार या देशाच्या घटनेने उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना दिलेला नाही. मात्र "घरगुती पद्धतीने घटना दुरुस्त" करण्यात आलेली आहे असे समजून या अधिकाऱ्यांनी तो अधिकार वापरला.

**४.६** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (५)

**५.१ एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे.**

**५.२** गेल्या काही वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची हिंमत इतकी वाढली की, देशाच्या मा. राष्ट्रपतींची व केंद्रशासनाची व राज्यमंत्रिमंडळाची फसवणूक करण्याचा प्रकार सुद्धा यातून घडला असे स्पष्टपणे दिसून येते. तो प्रकार पुढीलप्रमाणे :- केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २६ सप्टेंबर २०१९ रोजी "Reimbursement of central share for implementation of the scheme of revision of pay scales (7th CPC) of university and college teachers to the Govt. of Maharashtra-reg." या विषयावर एक शासकीय अधिसूचना (F.No.1-7/2019-U.II) निर्गमित केली ***(यापुढे उल्लेख केंद्रशासनाची अधिसूचना असा)*** असून या अधिसूचनेतील परिच्छेद ३ पुढीलप्रमाणे आहे:-

**"3. The sanction of the President is hereby accorded to the payment of Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019. **This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above."**

**५.३ रुपये १३२० कोटी ९३ लक्ष एवढा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे,** असेही या अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद आहे. घटनाशास्त्राच्या प्रत्येकच विद्यार्थ्याला याची कल्पना असते की, केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता देऊन प्रस्ताव पाठविल्यानंतरच भारताचे मा.राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब करतात. केंद्रीय मंत्रीमंडळाने या रकमेला मान्यता दिलेली आहे. अशी मान्यता दिली असल्याबाबतचा स्पष्ट उल्लेख २६ सप्टेंबर २०१९ च्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेच्या परिच्छेद १ मध्ये आहे. तो पुढील शब्दात:-

"The Central Government had decided to provide financial assistance to State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre, as per above said letters of this Department, by way of reimbursement, to the extent of 50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Government, **for the period from 01.01.2016 to 31.03.2019, subject to fulfillment of prescribed terms and conditions."**

**५.४** राज्यशासनाने थकबाकी अदा केल्यानंतर ५० टक्के रकमेच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये केंद्रशासनाकडे सादर करावयाचा आहे, असेही या अधिसूचनेमध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"(c) The **proposal for reimbursement** on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments."

प्रतिपूर्ती ही (Reimbursement) प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची होत असते. मा.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात या शब्दाचा अर्थ ठरवून दिला आहे तो पुढीलप्रमाणे :-

"Reimbursement has to mean and imply restoration of an equivalent for something paid or expended. Reimbursement presupposes previous payment." - *Tata Iron & Steel Co. Ltd. V. Union of India, (2001) 2 SCC 41 (50) : 2000 (8) Supreme 73: 2000 (8) SCALE 3: JT 2000 (Supp-3) SC 428: AIR 2000 SC 3706: 2000. (Supp-5) SCR 228: 2000 (8) SLT 625: 2001 (1) SRJ 156.*

**न केलेल्या खर्चाची केंद्रशासनाकडून प्रतिपूर्ती मिळविणे हा फसवणुकीच्या स्वरूपाचा फौजदारी गुन्हा आहे. गुन्हेगारी स्वरूपाच्या अशा कृत्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.**

**५.५ केंद्रशासनातर्फे हे जे साहाय्य दिले जात आहे, हे केंद्राची संपूर्ण योजना (Entire Scheme) एक "समग्र योजना" (Composite Scheme) म्हणून कोणताही बदल न करता सर्व अटी व शर्तीसह व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्ससह राज्यशासनाला अंमलात आणावी लागेल या अटीवरच देण्यात येत आहे, असाही स्पष्ट उल्लेख केंद्रशासनाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद 4 च्या उपपरिच्छेद (h) मध्ये आहे.** तो पुढील शब्दात:-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the **entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification..."**

**५.६ केंद्रशासनाच्या दिनांक २ नोव्हेंबर २०१७ व ८ नोव्हेंबर २०१७ या तारखांच्या दोन पत्रांमधील तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या रेग्युलेशन्समधील अटी व शर्ती यांचे पूर्णपणे पालन केल्या जाईल, या अटीवरच हे अनुदान देण्यात येत आहे, असा एक स्वतंत्र परिच्छेद केंद्राच्या अधिसूचनेमध्ये आहे.** तो परिच्छेद ५ पुढीलप्रमाणे आहे:-

"5. The grant is further subject to the terms and conditions stipulated in this Ministry's letter No.1-7/2015-U.II(1) dated 2nd November, 2017 & 8th November, 2017 and subsequent instructions/clarifications, if any, issued from time to time and UGC's Notification dated 18th July, 2018."

**५.७** राज्याला हा निधी मंजूर करणाऱ्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेची प्रत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांना अग्रेषित करण्यात आली असून या अधिसूचनेच्या परिच्छेद ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती समाविष्ट असलेली योजना राज्यातर्फे जशीच्या तशी अंमलात आणल्या जाईल, या अटीवरच हे अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे, असे स्पष्टपणे बजावण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"Copy to (1) The Secretary, Higher and Technical Education Department, Govt. of Maharashtra, 411, Mantralaya Annexe, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032. It may kindly be noted that implementation of the Scheme of revision of pay scales for teachers and other equivalent cadres in universities/ colleges in Maharashtra shall be subject to the conditions stipulated in Para 4 and 5 of this sanction letter as well as those laid down in the guidelines/regulations/orders that may be issued by the Government of India/UGC in this behalf from time to time."

**५.८ मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय. या सर्व बाबींची चौकशी करण्यात यावी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.**

**५.९** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (६)

**६.१ "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील"** सन २०१० मधील मा.उच्च न्यायालयाच्या पहिल्या निर्णयाने व त्याच वर्षी आणखी एका खंडपीठाने दिलेल्या दुसऱ्या न्यायालयीन निर्णयाने हा कायद्याचा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले. त्याला धरून दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी आणखी एका प्रकरणात मा.नागपूर खंडपीठाने तत्सम निर्णय दिला. त्यापूर्वी अनेक खंडपीठांनी तसेच निर्णय दिलेले असल्यामुळे सरकारी वकिल निर्णयाशी सहमत झाले. तरीही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी हे प्रकरण विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या लायकीचे नाही, तेव्हा विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना मागे घ्याव्यात अशी विभागाला विनंती केली पण उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला राजहट्ट कायम ठेवला.

**६.२** विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल झाली व फेटाळल्या गेली. सर्वोच्च न्यायालयाने अशी आगंतुक (uncalled for) प्रकरणे इथे आणत जाऊ नका असे ताशेरे ओढले. राज्यशासनाकडून आगंतुक प्रकरणे दाखल होण्याची संख्या फार वाढली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत कारवाई करावी असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे परिपत्रक काढले पण उच्च शिक्षण विभागातील अधिकारी दुरुस्त व्हायला तयार नाहीत. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर २०२४ पर्यंत त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय अजूनही निर्गमित होऊ नये ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ९ खंडपीठांनी उपरोक्तप्रमाणे निर्णय दिले. तत्पूर्वीच मा.सर्वोच्च न्यायालयाने 'आगंतुक' प्रकरणे इकडे आणत जाऊ नका असे फटके मारल्यानंतरसुद्धा काहीच सुधारणा होऊ नये हे तर अत्यंत लज्जास्पद वर्तन होय.

**६.३ "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील"** असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. असे असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले. त्यांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात

"**(ब) अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली.

**६.४** उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. साधारणपणे लिहिता वाचता येणाऱ्या व्यक्तिनांच उच्च शिक्षण संचालक व उपसचिव, उच्च शिक्षण या पदांवर नेमले जाते ना? मग एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचा उपयोग काय?

**६.५** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (७)

**७.१ "नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून जुनीच पेन्शन योजना लागू करावी लागेल"** अशा अर्थाचे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी निर्णय दिले. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. पण उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी त्यासंदर्भात कसा खेळखंडोबा केला याचा इतिहास त्या विभागाला लाजेने मान खाली घालायला लावणारा आहे. याबाबतीत पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. *(120/2018)* मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये याचिकाकर्त्याबाबतचे तपशील पुढील शब्दात नमूद आहेत :-

"We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the **Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination.** Not only this but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement." *(120/2018)*

**७.२** मा. खंडपीठाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उद्धृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेले आहे. :-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."

**७.३** या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

७.४ मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली. (Civil Diary No. 14703/2019) दिनांक १ जुलै २०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली. मा.उच्च न्यायालयाचा हा पहिला निर्णय दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजीचा आहे. त्यावर केव्हाही स्थगनादेश नव्हता. उलट SLP फेटाळून लावण्यात आली. असे असताना जवळ जवळ तीन वर्षे याबाबत उच्च शिक्षण विभागाने धोरणात्मक निर्णय निर्गमित करण्याची कोणतीही कारवाई केली नाही. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा दुसरा धोरणात्मक निर्णय सन २०१७ च्या याचिका क्रमांक १२१९ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.मुंबई खंडपीठाने दिला. पहिल्या धोरणात्मक निर्णयाचा स्पष्ट उल्लेख या दुसऱ्या निर्णयामध्ये करण्यात आला असून त्या सारखेच हे प्रकरण असल्याचे खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"(3) The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018. We therefore find it appropriate to allow this Petition in the light of the judgment of the Division Bench dated 3rd October 2018 passed in Writ Petition No.13166 of 2017." *(137/2018)*

७.५ या निर्णयामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश तर मा.उच्च न्यायालयाने दिलेच, मात्र त्याचबरोबर जुनी पेन्शन योजना लागू करतांना ५.१०.१९९२ या नेमणुकीच्या तारखेपासून त्या शिक्षकाची सेवा धरावी लागेल असे स्पष्ट आदेश या प्रकरणात पारित केले ते पुढीलप्रमाणे :-

**"ORDER : (i)** The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of her last drawn salary. **(ii)** The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today. **(iii)** Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 05/10/1992. **(iv)** The Writ Petition is disposed of in the aforesaid terms." *(137/2018)*

७.६ पहिला धोरणात्मक निर्णय शिक्षकांच्या बाजूने लागला व तो सर्वोच्च न्यायालयात कन्फर्म झाला तरीही धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित न झाल्यामुळे शेकडो शिक्षकांना उच्च न्यायालयात जावे लागले. एकही निर्णय त्यांच्या विरोधात गेला नाही. जवळ जवळ ३५ वर खंडपीठांनी याबाबत अनुकूल निर्णय दिले. त्यातील महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या २१ निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे:-

**(1)** Writ Petition No. 13166 of 2017, Date of Judgment : 03rd October, 2018. **(2)** Writ Petition No.1219 of 2017, Date of Judgment : 19th October, 2018. **(3)** Writ Petition No. 1304 of 2016, Date of Judgment :12th December, 2018. **(4)** Writ Petition No. 755 of 2019, Date of Judgment : 9th April 2019. **(5)** Writ Petition No. 3293 of 2019, Date of Judgment :18/06/2019. **(6)** Writ Petition No. 2068 of 2019, Date of Judgment : 29th July 2019. **(7)** Writ Petition No. 11316 of 2015, Date of Judgment : 28th August 2019. **(8)** Writ Petition No.7375 of 2019, Date of Judgment : 9th July, 2020. **(9)** Writ Petition No.7395 of 2019, Date of Judgment : 9th July, 2020. **(10)** Writ Petition No. 9215 of 2018, Date of Judgment : 12th March, 2019. **(11)** Writ Petition No. 8909 of 2016, Date of Judgment : 3 February 2021. **(12)** Writ Petition No. 2719 of 2020, Date of Judgment : 09th February, 2021. **(13)** Writ Petition No. 7292 of 2020, Date of Judgment : 09th February, 2021. **(14)** Writ Petition No. 6905 of 2021, Date of Judgment : 20th August, 2021. **(15)** Writ Petition No.785 & 786 of 2021, Date of Judgment : 23rd August 2021. **(16)** Writ Petition No.2241 of 2021, Date of Judgment : 31st August, 2021. **(17)** Writ Petition No.2238 of 2021, Date of Judgment : 31st August, 2021. **(18)** Writ Petition No. 8724 of 2021, Date of Judgment : 05th October, 2021. **(19)** Writ Petition No. 2098 of 2021, Date of Judgment : 16.11.2021. **(20)** Writ Petition No. 2900 of 2020, Date of Judgment : 23rd November, 2021. **(21)** Writ Petition No. 404 of 2021, Date of Judgment : 23rd November, 2021.

७.७ मा.उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठाने जे निर्णय दिले त्यापैकी एका निर्णयात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविलेल्या एका पत्राचा उल्लेख आहे तो पुढील शब्दात :-

"21. This court had considered that pursuant to directions to UGC by Division Bench of this court at Nagpur dated 20-04-2011 in Writ Petition No. 4908 of 2010, UGC in its meeting held on 08-07-2011 had resolved and accordingly **on 16-08-2011 communicated the same to the General Secretary of Maharashtra Federation of University and College Teachers Organization** with reference to its representation dated 17th August, 2011 as under:-

*"Kindly refer to your representation dated 17th August, 2011 on the subject mentioned above. The issue raised in the representation has been examined in the UGC and this is to inform you that, the Commission in its meeting held on 08-07-2011 considered the representation received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19th September, 1991 till 3rd April 2001 and resolved as under:-*

*"The Commission deliberated on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19, 1991 until April 3, 2000 and resolved that, all such appointments made on regular basis by various Universities in the State of Maharashtra where the University has granted exemption to teacher from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent notification dated 24.12.1998 and where the representation has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointment made during the said period w. e. f. September 19, 1991 till April 3, 2000 is approved. ...."*

*The above decision (dated 08-07-2011) of the Commission has alreadybeen communicated by the UGC vide its letter No. F-1-1/2002 (PS) Exemp, Pt. File IV dated 16th August 2011 to the Principal Secretary, State of Maharashtra, Higher and Technical Education Department, Mumbai.*

*As may be seen from the above decision of the Commission, the Commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 1991 to April 3, 2000.* ***Therefore, the services of such teachers for all purpose should be counted from the date of their regular appointment."***

७.८ आणखी एका प्रकरणात तर मा.उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात असे नमूद केले होते की, **"It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by government of Maharashtra providing for eligibility tests by UGC** or tests accredited by UGC." पण त्यापासून या अधिकाऱ्यांनी काही बोध घेतला नाही.

७.९ अनेक प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी निर्णय दिले. मा.सर्वोच्च न्यायालयाने त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले पण उच्च शिक्षण विभाग काहीच कृती करीत नाही असे दिसून आल्यावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २३ सप्टेंबर २०२१ रोजीच्या बैठकीत आंदोलनाचा ठराव *(217/21)* संमत केला. ठरावानुसार आंदोलन दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रत्यक्ष सुरू झाले. या ठरावानुसार दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ पासून तीव्र आंदोलन सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता. तेव्हा कुठे दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ रोजी "**दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्तीवेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत**" या मथळ्याचा धोरणात्मक शासननिर्णय *(288/21)* निर्गमित करण्यात आला. धोरणात्मक शासननिर्णय निघाल्यानंतर सुद्धा एकएका शिक्षकाला बोलाविणे, त्याच्याशी अर्थपूर्ण चर्चा करणे हा 'उद्योग' उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सुरूच ठेवला. त्यामुळे शिक्षकांना उच्च न्यायालयात जावे लागले. अनेक प्रकरणी शिक्षकांच्या बाजूने निर्णय लागले. काही प्रकरणे प्रलंबित आहेत. धोरणात्मक शासननिर्णय निघाल्यावर उलटया रेघोट्या ओढण्याचा अधिकार या अधिकाऱ्यांना संविधानाने दिलेला नाही पण हे सर्व घरगुती पद्धतीने चालू आहे.

७.१० महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

## (८)

८.१ एम.फील धारकांना पदोन्नतीचे लाभ देणे तसेच नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे या दोनही प्रकरणामध्ये तेच तेच युक्तिवाद पुन्हा पुन्हा न कंटाळता करायचे, मा.उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय दिला तरी त्या व्यक्तीपुरती अंमलबजावणी करून हात 'शेकत' राहायचे, या उच्च शिक्षण संचालनालयातील अधिकाऱ्यांच्या हट्टीपणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील शेकडो लोक वैतागून गेलेले आहेत. असाच वैताग मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कोणत्या शब्दात व्यक्त केलेला आहे ते पहा. :-

**"Finally, we are constrained to note our great dismay, even displeasure, at the manner in which the State Government persists in raking up the same defence again and again. We do not know how many times this Court has to pronounce the law."**

८.२ याच निर्णयात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, "The aforesaid extracts show that this Court had laid down the law, and the pronouncement was not limited to the facts of any particular case. Yet, the government persists in the belief that the law declared by this court is somehow not binding on it, or that every judgment, no matter what the wording and even if it clearly lays down the law is confined to that particular petition. **We are letting it pass this once, but if this is repeated we may well be moved to far sterner action."**

**८.३ सन २०२० ची याचिका क्रमांक LD-VC-CW No. 1045 of 2020** या प्रकरणात "**हा वादविषय संपुष्टात आला आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही दोघेही तुमचे डोके चालवा (apply your mind) व त्याबाबत आठ दिवसात शपथपत्र दाखल करा" असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३० ऑगस्ट २०२० रोजी पारित केले. "न्यायालयाच्या पूर्व निर्णयाच्या विरोधात तुम्ही काही निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत तुम्हाला मोजावी लागेल"** असेही त्या दिवशीच्या आदेशात नमूद आहे. न्यायालयाने निर्णय घेण्यासाठी दिलेली मुदत संपली. **न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे "वादविषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही" याबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांनी ठरलेल्या मुदतीत शपथपत्र दाखल केले नाही.**

**८.४ सन २०२० ची याचिका क्रमांक ST. No.9649** दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी सुनावणीला आली तेव्हा त्याच त्या विषयावर लोकांना पुन्हा पुन्हा याचिका दाखल करायला उच्च शिक्षण विभाग भाग पाडत आहे, ही गोष्ट मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने असे आदेश पारित केले की, "**प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी W.P. 13166 of 2017 या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घ्यावा. त्याचबरोबर विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी.ए.) १३०९/२०२० या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयसुद्धा विचारात घ्यावा.** हे दोनही निर्णय विचारात घेऊन उच्च शिक्षण विभागाने घेतलेला अंतिम निर्णय **नमूद असलेले शपथपत्र मा.उच्च न्यायालयात सादर करावे.**" या आदेशाचे पालन करण्यात आले नाही.

**उपरोक्त दोनही प्रकरणात प्रधान सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण हे क्रमांक एक व दोनचे प्रतिवादी होते. उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिला व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले असतांना तसे न करणे हे घटनाबाह्य वर्तन होय.**

## (९)

९.१ मा.सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात "**(i) या सर्व शिक्षकांचे ७१ दिवसांचे बेकायदेशीररीत्या कापलेले वेतन त्यांना परत करा (ii) ते विलंबाने परत केल्याबद्दल देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत त्यावर आठ टक्के व्याज अदा करा**" असे आदेशित केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या दोनही रकमा त्यांना परत करा असा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निघाला. तर मा.सर्वोच्च न्यायालयाचे पूनर्विलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला. दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी "विलंबाबद्दल ८ टक्के रक्कम देण्याची बाब वगळून फक्त ७१ दिवसांचे कापलेले वेतन अदा करा" अशा अर्थाचे आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या सहसंचालकांना दिले. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?**

९.२ मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना काढलेल्या आपल्या आदेशात न्यायनिर्णयातील अर्धा भाग तसेच शासननिर्णयातील अर्धा भाग वगळून टाकण्याचा हा अधिकार "घरगुती पद्धतीने घटना दुरुस्त करून" उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या पदरात पाडून घेतला.

९.३ दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी जो आदेश काढला त्यामध्ये त्यांनी अध्यापकनिहाय **देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रकमेची मागणी आजच संचालनालयाला सादर करा** असे आपल्या आदेशात नमूद केले. पण या रकमा या शिक्षकांना पूर्णांशाने अदा करावयाच्या नाहीत. त्यात फार मोठ्या प्रमाणात कपात करावयाची असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले होते. त्यासाठी अत्यंत अभद्र मार्गाचा त्यांनी वापर केला. **आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना त्यांनी त्यातील शब्द गाळून टाकला. त्यामुळे मनमानी कपात करण्याचे समाधान त्यांनी मिळविले. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही.** देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आठ टक्क्याची रक्कम उच्च शिक्षण संचालकांकडून आजही अदा करण्यात आलेली नाही.

९.४ मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना उशिरा काढलेल्या आपल्या आदेशात न्यायनिर्णयातील शब्द वगळून टाकण्याचा हा अधिकार "घरगुती पद्धतीने घटना दुरुस्त करून" उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या पदरात पाडून घेतला.

## (१०)

१०.१ मा.उच्च न्यायालयाने २७१९/२०२० या प्रकरणात दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेल्या एक निर्णयाला एका सहसंचालकांनी दिनांक १२ मे २०२१ रोजी एक आदेश काढून स्थगिती *(188/21)* देण्याचा अभूतपूर्व अपप्रकार महाराष्ट्राने पाहिला, तेव्हा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या हकालपट्टीची मागणी करावी लागली. हकालपट्टी झाली व अवमान याचिकेनंतर मूळ निर्णयाची अंमलबजावणी झाली.

१०.२ मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा फक्त मा.सर्वोच्च न्यायालयाला अधिकार आहे. तो "घरगुती पद्धतीने घटना दुरुस्त करून" उच्च

शिक्षण संचालकांनी आपल्या पदरात पाडून घेतला.

## (११)

**११.१** मारुती दत्तात्रय पाटील प्रकरणात शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) दिनांक १ जुलै २०१९ रोजी 'डिसमिस' झाली. त्यानंतर विजयकुमार रणपीसे प्रकरणात SLP दाखल करतांना "यापूर्वी तत्सम प्रकरण या न्यायालयात निकाली निघाले आहे काय?" या रकान्यापुढे "No similar matter is disposed of" अशी धडधडीत खोटी माहिती उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शपथपत्रावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. एवढ्यावर हा खोटेपणा थांबला नाही तर "तत्सम प्रकरण या न्यायालयात प्रलंबित आहे काय?" हा रकाना भरतांना राजेश वसंतराव पांडे यांचे प्रकरण आपल्याच अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनामुळे येथे 'पेंडींग' पडलेले आहे याची माहिती असतांना **"No similar matter is pending" अशी धडधडीत खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. असा खोटारडेपणा एकापेक्षा जास्त प्रकरणात या अधिकाऱ्यांनी केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. खोटेपणा उघडा पडल्याने त्या सर्व प्रकरणी 'डिसमिस' त्यांच्या नशिबी आले.**

## (१२)

**१२.१ तत्सम विषयावरील तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर W.P.No. 4289 of 2019 च्या सुनावणीच्या वेळी सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण 'पेंडींग' पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते 'पेंडींग' पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल. अर्थात हे यश तात्पुरतेच होते.**

## (१३)

**१३.१** मंत्रालयातील अधिकारी व उच्च शिक्षण संचालक व सहसंचालक यांनी महाराष्ट्रातील विद्यापीठांची दुर्दैवी अशी दयनीय अवस्था करून ठेवलेली आहे. या अधिकाऱ्यांनी सर्व विद्यापीठांना याबाबतच्या स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत, त्या अशा की, भारतीय संविधानातील कलम २५४ चे पालन करण्याचे कोणतीही आवश्यकता नाही. जरी या कलमामध्ये विधिवतरीत्या कोणतीही दुरुस्ती झालेली नसली तरी आम्ही हे कलम घरगुती पद्धतीने दुरुस्त केलेले आहे असे समजा व त्याप्रमाणे तुमची वर्तणूक ठेवा. मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनविषयी जो निर्णय दिलेला आहे तो महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेला असला तरी आम्ही अधिकारी सांगतो म्हणून तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करा व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनची व शासननिर्णयाची अंमलबजावणी करतांना रेग्युलेशनमधील तरतुदी बाजूला ठेवून शासननिर्णयाप्रमाणे कारवाई करा. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या या आदेशाचे महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच्या सर्व विद्यापीठांनी पालन केल्याचे दिसून येते.

**१३.२** उच्च शिक्षण विभागाच्या या घटनाबाह्य सूचना लक्षात घेऊन सर्व विद्यापीठांनी त्यांचे आदेश काढले. मुंबई विद्यापीठाने दिनांक २६ मार्च २०१९ रोजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने दिनांक १० एप्रिल २०१९ रोजी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिनांक १९ मार्च २०१९ रोजी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दिनांक २ एप्रिल २०१९ रोजी, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने दिनांक २५ मार्च २०१९ रोजी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने दिनांक २५ मार्च २०१९ रोजी, गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने दिनांक २ एप्रिल २०१९ रोजी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने दिनांक २ एप्रिल २०१९ रोजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने दिनांक २५ मार्च २०१९ रोजी, स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेड यांनी दिनांक २६ मार्च २०१९ रोजी याबाबतचे आदेश काढले.

**१३.३** उच्च शिक्षण विभागाच्या या घटनाबाह्य धोरणाचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी काढलेल्या या आदेशांमध्ये एकवाक्यता आहे. ही एकवाक्यता कशी आली? तर उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी "केंद्रस्थ मध्यवर्ती घटनाबाह्य संसूचन केंद्र" म्हणून भूमिका पार पाडली त्यामुळेच हे घडून आले. एखाद्या केंद्रस्थ मध्यवर्ती ठिकाणाहून अशा सूचना आल्याशिवाय महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या आदेशांमध्ये अशा प्रकारची एकवाक्यता राहू शकत नाही. हे स्पष्ट आहे त्या त्या विद्यापीठांनी आदेश काढले असते तर या आदेशांमध्ये थोडाफार फरक राहिला असता, कोणत्याही परिस्थितीमध्ये एकवाक्यता राहिली नसती. पण मध्यवर्ती केंद्रस्थ ठिकाणाहून आलेल्या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या सूचनांमुळे या सर्व विद्यापीठांच्या आदेशांमध्ये एकवाक्यता आहे. या सर्वच विद्यापीठांचे आदेश असे सांगत आहेत की, :- भारतीय घटनेतील तरतुदींचे पालन करण्याची काहीही आवश्यकता नाही, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करण्याची काहीही गरज नाही, यूजीसी रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व मान्य करण्याची गरज नाही. रेग्युलेशनमध्ये आणि शासनाच्या निर्णयामध्ये विसंगती असेल तर रेग्युलेशनला बाजूला ठेवा व शासननिर्णयाप्रमाणे कारवाई करा. आज महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये अशारीतीने घटनाबाह्य कारभार चालू आहे व त्यातून शेकडो प्रकरणे न्यायालयामध्ये गेलेली आहेत.

**१३.४** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने जानेवारी २०२४ मध्ये तपशीलवार निवेदनासह या बाबी मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. "**भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगीन**" अशी शपथ घेऊन ते उच्च शिक्षणमंत्री पदी आरुढ झालेले आहेत. "**भारतीय संविधान व कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःस्पृहपणे, तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.**" अशी शपथसुद्धा त्यांनी घेतलेली आहे. त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे तो थांबविण्यासाठी त्यांनी कोणतीही कृती केली नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

**१४.** गेल्या काही वर्षांमध्ये उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये धुमाकूळ घातलेला आहे. असा धुमाकूळ घालतांना भारतीय संविधानातील कलम २५४ च्या विरोधात ते दिवसाढवळ्या वर्तन करीत आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने या कलमाचा जो अर्थ सांगितलेला आहे, तो महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेला असला तरी हे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी तो मान्य करायला अजिबात तयार नाहीत. "७१ दिवसांचे वेतन परत करा व विलंबाने परत केल्याबद्दल देय दिनांकापासून ८ टक्के दराने व्याज अदा करा" असा मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला, तो मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केला. राज्यशासनाने त्याप्रमाणे शासननिर्णय काढला, पण उच्च शिक्षण संचालक यांनी अंमलबजावणी करतांना बिनदिक्कतपणे त्या आदेशातील अर्धा भाग वगळून टाकला. याबद्दल "अवमान याचिका दाखल झाल्यास तुम्ही जबाबदार राहाल" असे उच्च शिक्षण सचिवांनी उच्च शिक्षण संचालकांना कळविल्यानंतरसुद्धा उच्च शिक्षण संचालक त्याची अंमलबजावणी करीत नाहीत. इतकेच नव्हे तर अंमलबजावणी करण्यासाठी काढलेल्या आदेशात उच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करतांना त्यातील शब्द वगळून टाकतात. हे कृत्त्य घटनाबाह्य तर आहेच पण गुन्हेगारी स्वरूपाचे आहे. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करतांना व एम.फील धारकांना नियुक्तीच्या दिनांकापासून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देतांना एकएका शिक्षकांला चकरा मारायला लावणे, त्यांच्याशी केलेली अर्थपूर्ण चर्चा यशस्वी न झाल्यास त्यांना उच्च न्यायालयात जाण्यास भाग पाडणे, उच्च न्यायालयाचा धोरणात्मक निर्णय झाल्यानंतरसुद्धा त्या एका शिक्षकापुरती अंमलबजावणी करून धोरणात्मक निर्णय निर्गमित न करणे व एकापेक्षा जास्त विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतरसुद्धा प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पेन्डींग आहे अशी धडधडीत खोटी माहिती उच्च न्यायालयासमोर दाखल करणे, अशा प्रकारची असत्य माहिती नमूद असलेली अनेक शपथपत्रे सर्वोच्च न्यायालयात दाखल करणे, हा या अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा 'रुटिन' भाग झालेला आहे.

**१५.** या सर्व बाबी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने जानेवारी २०२४ मध्ये एका तपशीलवार ठरावान्वये मा.उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिल्यात तरीही त्यावर उच्च शिक्षणमंत्र्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. ही अराजकता संपुष्टात यावी असे आज त्या विभागात कोणालाही वाटत नाही. म्हणून मी या पत्राद्वारे या सर्व बाबी आपल्या लक्षात आणून देत आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करून आपण मार्ग काढावा व ही अराजकतेची स्थिति संपुष्टात आणावी अशी आपणास विनंती आहे.

आपला विनित,

**प्रा.बी.टी.देशमुख,**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**पत्राची प्रतिलिपी :** (१) श्री.देवेंद्रजी फडणवीस, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (२) श्री.अजितदादा पवार, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहितीसाठी व यथोचित कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.

**प्रा.बी.टी.देशमुख,**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालय रोड, अमरावती - ४४४ ६०४

मो.नं. ९८९०९०९७०१ E-mail ID : btdeshmukh@rediffmail.com

***दिनांक :- ३० सप्टेंबर, २०२४***

प्रति,

**मा.एकनाथजी शिंदे**, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**विषय :** "घरगुती पद्धतीने घटनाबदल" करून त्याप्रमाणे वापर करण्याच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या घटनाबाह्य वर्तनाला आळा घालण्याबाबत.

**संदर्भ :** उपरोक्त विषयावर मी आपणास सादर केलेले दिनांक २४ जून २०२४ रोजीचे निवेदन.

मा.महोदय,

उच्च शिक्षण विभागातील अधिकारी भारतीय संविधानातील अनेक तरतुदींचा भंग करतात, मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करून विपरित आदेश प्रसारित करतात, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगनादेश देण्याचा अधिकार फक्त मा.सर्वोच्च न्यायालयाला असतांना एक उच्च शिक्षण सहसंचालक त्या निर्णयाला स्थगनादेश देतात, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केल्यानंतर व राज्यशासनाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करा असे आदेश काढल्यानंतर राज्याचे उच्च शिक्षण संचालक तसे आदेश काढतांना उच्च न्यायालयाच्या निर्णयातील अर्धा भाग संपूर्णपणे गाळून टाकतात. याबाबत अवमान याचिकेची नोटीस दिल्यानंतर उच्च शिक्षण सचिवांनी दटावल्यामुळे दुरुस्त झालेले उच्च शिक्षण संचालक पुन्हा काढलेल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करतांना त्यातील शब्द वगळून टाकतात व अर्धवटपणे अंमलबजावणी करतात अशा निरनिराळ्या १५ बाबी मी आपल्या लक्षात आणून दिलेल्या होत्या. त्याबाबतीत आजपर्यंत कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. उच्च शिक्षण विभागामध्ये चालू असलेली ही अराजकता, बेबंदशाही व घटनाविरोधी कारभार आपल्या लक्षात आणून देण्यात माझे निवेदन हे पुरेसे यशस्वी झालेले नाही असे मला वाटते व त्यामुळेच याबाबतचे आणखी काही तपशील आपल्या लक्षात आणून देण्यासाठी हे दुसरे निवेदन मी आपणास सादर करीत आहे.

## (१६)

**१६.** "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील पदवी धारण केलेली आहे अशा नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील" असा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने **SUDHIR SHARADRAO HUNGE** (In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur, Writ Petition No.1489/2010, Date of Judgment : 02.07.2010) या प्रकरणात दिला. जुलै २०१० मध्ये झालेल्या मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाला तातडीने ऑगस्ट २०१० मध्ये बैठक घेऊन धोरणात्मक निर्णय करावा लागला.

**१६.१** मा.उच्च न्यायालयासमोर या प्रकरणामध्ये काय प्रश्न निर्णयासाठी होता याबाबतचा स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये आहे. दिनांक ११ जुलै २००९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या ज्ञापनानुसार एम.फील असलेल्यांना नेट-सेट मुक्तता असेल ही तरतूद काढून टाकली. काढून टाकलेली ही तरतूद पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येते काय? हाच या प्रकरणामधील प्रश्न आहे असे मा.उच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

**१६.२** मा. खंडपीठाने याबाबतीत स्वतःच वरप्रमाणे प्रश्न उपस्थित करून सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन तसेच वस्तुस्थिती व कायद्याच्या प्रश्नांचा तपशीलवार ऊहापोह करून परिच्छेद ११ मध्ये याबाबतचा आपला निर्णय नोंदविला आहे. तो पुढील शब्दात :-

"For all the above reasons, therefore, we answer the question framed by us holding that the selections and appointments made pursuant to the advertisements published in these writ petitions prior to 11.07.2009 shall not be affected by introduction of compulsory NET/SLET eligibility criteria as **the said gazette notification dated 11.07.2009 is prospective in nature....."**

**१६.३** मा. उच्च न्यायालयाने आपला हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या तीन निर्णयांच्या आधारावर दिलेला आहे व तसे आपल्या निर्णयात तपशीलाने नमूद केलेले आहे. ते तीन निर्णय पुढीलप्रमाणेः-

**(i)** Ashok Kumar Sharma and others...Versus...Chander Shekhar and another, reported in 1997 (4) Supreme Court Cases 18

**(ii)** Gopal Krushna Rath...Versus...M.A.A. Baig (Dead) By Lrs. and others, reported in 1999 (1) Supreme Court Cases 544

**(iii)** Madan Mohan Sharma and another...Versus...State of Rajasthan and others, reported in 2008 (3) Supreme Court Cases 724

**१६.४** "एम.फील. पदवी धारण केलेल्या शिक्षकाला नेट-सेटच्या पात्रतेची आश्वासित प्रगती योजनेसाठी आवश्यकता असणार नाही" ही तरतूद विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ११.०७.२००९ च्या अधिसूचनेने काढून टाकली. काढून टाकण्याचा हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही असा धोरणात्मक निर्णय मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिला. सदरहू प्रकरणामध्ये असे दिसून येते की, निरनिराळ्या २६ याचिका मा. खंडपीठाने एकत्रितरीत्या सुनावणीला घेतल्या व एकत्रच **दिनांक २ जुलै २०१०** रोजी या प्रकरणी निर्णय दिला. या २६ याचिकांमध्ये बहुतेक याचिकेत एकच याचिकाकर्ता असला तरी काही याचिकांमध्ये दोन, चार व सहा याचिकाकर्ते असून अशी ही एकूण याचिकाकर्त्यांची संख्या ३५ च्या वर आहे. यातील प्रत्येक याचिकाकर्ता विधिवतरीत्या निवड समिती मार्फत निवड होऊन सेवेत आलेला आहे व त्यातील प्रत्येक याचिकाकर्ता हा एम.फील. पदवी धारक आहे. या प्रकरणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, हा निर्णय कोण्यातरी एका व्यक्तीच्या बाबतीत व एका व्यक्तीपुरता दिलेला निर्णय नाही तर तो धोरणात्मक निर्णय (In Rem) आहे. **एखादी पात्रता किंवा अपात्रता लागू करावयाची असेल किंवा काढून टाकावयाची असेल तर तुम्हाला तसे पूर्वलक्षी प्रभावाने करता येणार नाही तर ते भावी प्रभावाने लागू होईल. असा हा धोरणात्मक निर्णय आहे.**

**१६.५** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणी दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेल्या **या निर्णयाच्या विरोधात राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली नाही. त्यामुळे मा. खंडपीठाच्या या निर्णयाला याबाबतीत "कायद्याचा अंतिम शब्द" हे स्थान प्राप्त झाले.**

**१६.६** विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजी आपल्या ४७१ व्या बैठकीत ताबडतोबच या निर्णयाशी सुसंगत असा निर्णय *(41/21)* घेतला. त्यातील या प्रकरणाशी संबंधित भाग पुढीलप्रमाणे :-

"(iii) The Commission further resolved that since both the above mentioned Regulations are prospective and not retrospective in nature, therefore, **all candidates having M.Phil degree on or before 10th July, 2009 shall remain exempted from the requirement of NET for the purpose of appointment as Lecturer/Assistant Professor."**

**१६.७** या प्रकरणामध्ये पहिला धोरणात्मक निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने **दिनांक २ जुलै २०१०** रोजी दिलेला होता. दुसरा धोरणात्मक निर्णय **ATUL SURESH PATIL** (In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad, Writ Petition No. 357 of 2010, Date of Judgment : **20th October, 2010**) : या प्रकरणामध्ये झाला. या प्रकरणी सुनावणी होत असतांना दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त याचिकाकर्त्यातर्फे खंडपीठासमोर दाखल करण्यात आले होते. याचा उल्लेख न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये नमूद आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"Not only this but perusal of the Minutes of the 471st meeting of the UGC held on 12/8/2010 would also fortify the case of the petitioners. The copy of the said Minutes are produced by the petitioners. The same are taken on record and marked "X" for identification." *(40/21)*

**१६.८** मा.उच्च न्यायालयाच्या पहिल्या धोरणात्मक निर्णयाचा व त्या निर्णयामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या तत्सम धोरणात्मक निर्णयाचा या दुसऱ्या धोरणात्मक निर्णयामध्ये तपशीलवारपणे उल्लेख करण्यात आलेला आहे. एम.फील. पदवी बाबतचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय तपशीलवारपणे उच्च न्यायालयाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये उद्धृत केला व त्यानंतर परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.:-

"It can thus be seen that UGC itself has resolved that all the candidates who are possessing M.Phil on or before 1/7/2009 shall remain exempted from the requirement of NET for the purpose of appointment as Lecturer/Assistant Professor. It is not in dispute that all the petitioners are having a degree of M.Phil before 10/7/2009." *(40/21)*

**१६.९** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारावर उच्च न्यायालयाचा तिसरा धोरणात्मक निर्णय **DR. MAHESH PRABHAKAR KULTHE** (In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad, Writ Petition No. 10149 of 2010, Date of Judgment : October 17, 2013) : या प्रकरणामध्ये झाला. या न्यायनिर्णयात जवळ जवळ २०५ अधिव्याख्याते याचिकाकर्ते होते. या खंडपीठासमोर विद्यापीठ अनुदान आयोगाने जे शपथपत्र सादर केले त्या शपथपत्रामध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाचे १९९१ चे रेग्युलेशन्स राज्यशासनाने महाराष्ट्रात अंमलातच आणले नव्हते." असे स्पष्टपणे नमूद केले होते. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये ते उद्धृत करण्यात आलेले आहे. पुढील शब्दात :- **"It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by government of Maharashtra providing for eligibility tests by UGC"** नेट-सेटची पात्रता महाराष्ट्रात लागूच करण्यात आलेली नव्हती त्यामुळे एम.फील. पदवी असली काय किंवा नसली काय?

**१६.१०** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या आधारावर सुधीर हुंगे प्रकरणात (W.P.No. 1489 of 2010) मा. नागपूर खंडपीठाने दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेल्या निर्णयाचा परिच्छेद ६ मध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे व शेवटी निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत. :-

"In that view of the matter, since it is an undisputed position that all the petitioners are having M.Phil qualification prior to 10/7/2009 and that in the advertisement, there was no requirement of compulsorily having the qualification of NET/SET, we find that the case of the present petitioners is squarely covered by the judgment of the Division Bench of this Court at Nagpur Bench cited supra and also by the resolution of the UGC." *(41/21)*

**१६.११** मा.उच्च न्यायालयाचा याबाबतचा हा तिसरा निर्णयसुद्धा धोरणात्मक निर्णय असून तो उच्च न्यायालयाच्या पहिल्या निर्णयाच्या धर्तीवर व आधारावर दिलेला असून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १६.०८.२०११ रोजीच्या पत्रान्वये "As may be seen from the above decision of the Commission, the Commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 1991 to April 3, 2000. **Therefore, the services of such teachers for all purpose should be counted from the date of their regular appointment."** असे कळविले होते याचा स्पष्ट उल्लेख या निर्णयात आहे. या पत्राची प्रत महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण सचिवांनासुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविल्याचे या निर्णयात नमूद आहे.

**१६.१२** हे सर्वच्या सर्व शिक्षक नेमणुकीच्या वेळी उचित पात्रता धारण करीत होते असा स्पष्ट उल्लेख खंडपीठाच्या निर्णयाच्या परिच्छेद २५ मध्ये आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"25. In the present case as well, the position is undisputed that the petitioners have been appointed during the period 19-09-1991 to 03-04-2000 by following due procedure viz. their selection by duly constituted committee; possessing of the educational qualifications as were applicable then save they had not passed NET/SLET examination and further that their appointments had undergone requisite scrutiny and had received approval. Majority of the petitioners have also improved their qualification during service period."

**१६.१३** या प्रकरणी मा. खंडपीठाने दिलेला आदेश परिच्छेद २९ मध्ये नमूद आहे. तो पुढील शब्दात :-

"29. In view of this and having regard to the earlier decisions of this court and particularly the subsequent resolution by UGC after 30-03-2010 as referred to above, keeping away the petitioners cases from being considered **for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry would give rise to invidious discrimination among similarly situated persons under the capricious decisions leaving the petitioners in lurch."**

**१६.१४** नेट-सेट मुक्त शिक्षकांना एम.फील. पदवी धारण करत असतील तर त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून सर्व लाभ देण्यात यावेत याबाबतीत धोरणात्मक निर्णयाचा महामेरू न्यायनिर्णय (Judgment In Rem) म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते अशा एका महत्त्वपूर्ण प्रकरणाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. या प्रकरणाचे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे आहेत :-

(In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur, Writ Petition No.1213/2009, Date of Judgment : 24.02.2017) : सदरहू प्रकरणामध्ये याचिकाकर्त्यांची नेमणूक दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी ग्रंथपाल म्हणून झालेली होती अशी स्पष्ट माहिती खंडपीठाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद आहे. ती पुढीलप्रमाणे :- "The Principal of the respondent no.4 – College vide appointment order dated 21.4.2003 informed the petitioner that she is appointed as a full time librarian on a probation for a period of two years." सदरहू याचिकाकर्त्यांनी मार्च २००९ मध्ये एम.फील. पदवी प्राप्त केलेली होती हेही या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :- " It is also not in dispute that the petitioner acquired M.Phil. qualification in the month of March, 2009."

**१६.१५** दिनांक १ जुलै २००९ पूर्वी नियुक्त झालेल्या. एम.फील. पदवी धारकांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्यात आलेली असून हा विषय आता वादविषय राहिलेला नाही. न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी याबाबतची अंतिम स्थिती सुनिश्चित झालेली आहे असे खंडपीठाने आपल्या निर्णयात नमूद केले असून सरकारी वकिलांनी सुद्धा ही गोष्ट मान्य केलेली आहे असेही आपल्या निर्णयाच्या परिच्छेद १० मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"The issue that the candidates who acquired M.Phil. qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/SET examination *is not res integra.* This Court in various decisions has ruled that the **candidates who acquired the M.Phil qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/SET examination. The learned Additional Government Pleader did not dispute this position."**

**१६.१६** शेवटी मा. उच्च न्यायालयाने याबाबतीत याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला. तो पुढील शब्दात :-

"In the present case, the petitioner acquired M.Phil

qualification in March, 2009. The petitioner in pursuance of the advertisement dated 30.3.2003 was holding the other qualification to hold the post of Librarian, except NET/SET. The petitioner, therefore, in our view, is entitled to have right to get approval from the respondent no.3 as a Librarian. In that view of the matter, the present writ petition needs to be allowed and the Rule is made absolute in terms of prayer clause (i) and (ii-a)."

**१६.१७** याचिकाकर्त्यांनी आपल्या याचिकेमध्ये परिच्छेद (i) व (ii-a) मध्ये केलेल्या प्रार्थना मा.उच्च न्यायालयाने मान्य केल्या असे या निर्णयात नमूद आहे. मात्र त्या प्रार्थना काय होत्या? हे त्या निर्णयात नमूद नाही. मूळ याचिकेमधून प्रार्थना खंड (Prayer Clause) पाहिल्याशिवाय याबाबतचा पूर्णपणे बोध होत नाही म्हणून संबंधित याचिकेतील प्रार्थना खंड (i) आणि (ii-a) जसाच्या तसा पुढे नमूद करण्यात येत आहे.

**"PRAYER :** "It is, therefore, most humbly prayed that this Hon'ble Court be pleased to issue a writ of certiorari, mandamus or any other appropriate writ order or direction and pleased to -

(i) Direct the respondents, especially respondent no. 3, to grant regular approval to the services of the petitioner from the date of her appointment;

(ii-a) Declare that the petitioner is eligible to be appointed as Librarian and is also entitled for continuation and regularization on the post held by her and **is also entitled for all consequential benefits."**

नेमणुकीच्या दिनांकापासून सेवेला नियमित मान्यता देण्यात यावी. तसेच शिक्षक या नात्याने उपलब्ध होणारे **सर्व अनुषंगिक लाभ (all consequential benefits) उपलब्ध करून द्यावेत असा मा.उच्च न्यायालयाचा हा आदेश आहे.**

**१६.१८** या प्रकरणातील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय हा दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी झाला. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी १८ ऑगस्ट २०१७ रोजी दिल्ली येथील सरकारी वकिलांना एक पत्र लिहून उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करावी असे कळविले. दिल्लीतील सरकारी वकिलांनी ही सारी कागदपत्रे तपासून विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याविषयीच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने मागे घ्याव्यात असे दिनांक २० नोव्हेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांना कळविले.

**१६.१९** आपण संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिलेली आहेत असे या पत्रात दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी नमूद केले होते. "The Learned Additional Government Pleader did not dispute this position." हे मा. खंडपीठाच्या निर्णयातील वाक्य उधृत करून दिल्लीतील सरकारी वकिलांनी असे नमूद केले होते की, या वाक्याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. **मा.उच्च न्यायालयासमोर सरकारी वकिल जेव्हा एखाद्या निर्णयाशी सहमत होतात तेव्हा त्यावर अपील करण्याची स्थिती हातून निघून गेलेली असते ही कायद्याची सर्वमान्य स्थिती आहे.** (settled legal position of law) सरकारी वकिल सहमत झाल्याची बाब चुकून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये नोंदविल्या गेली असेल तर ती नोंद चुकीची आहे म्हणून त्याच न्यायालयात पूनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल करणे हा मार्ग उपलब्ध असतो. दिल्ली येथील सरकारी वकिलांच्या पत्रातील हा मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"Today, I had a detailed conference about the matter with Dr. Archana Nerkar, Joint Director, Higher Education, Amravati Division, Amravati. So also, I have gone through the case papers in detail. It is observed that the High Court has considered the case in proper manner by observing in paragraphs no. 9 & 10.

*"9. It is also not in dispute that the petitioner acquired M.Phil. qualification in the month of March, 2009.*

*10. The issue that the candidates who acquired M.Phil. qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/SET **examination is not res integra.** This Court in various decisions has ruled that the candidates who acquired the M.Phil qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/SET examination. **The learned Additional Government Pleader did not dispute this position."***

In addition to that last sentence in paragraph no. 10 requires a serious consideration, ***"The learned Additional Government Pleader did not dispute this position."*** It is a settled legal position that no order can be challenged in case of concession given by a party. In case the concession is recorded wrongly, the State should first file a Review Petition by contending wrong recording of the concession and then only a Special Leave Petition can be filed."

**१६.२०** शेवटी या पत्रामध्ये दिल्ली येथील सरकारी वकिलांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याविषयीच्या आपल्या सूचना मागे घ्याव्यात अशी विनंती राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना केली होती. ती पुढील शब्दात :-

"Considering the documents on record, the judgment and order passed by the High Court and the concession of the Additional Govt. Pleader, I hereby opine that no purpose will be served in case the State files a Special Leave Petition. **You are therefore requested to withdraw the instructions given as per above referred letter."**

**१६.२१** एकंदर घटनाक्रमाचे अवलोकन करता असे दिसून येते की, विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा दुराग्रह उच्च शिक्षण विभागाने कायम ठेवला व त्यामुळे उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये ही विशेष अनुमती याचिका दिनांक ११ जुलै २०१८ रोजी सुनावणीला आली.

**१६.२२** भारतीय संविधानाच्या कलम १३६ अंतर्गत विशेष अनुमती याचिका दाखल करून घेण्यासाठीची कोणतीही कारणे समोर मांडण्यात आलेली नाहीत असे नमूद करून आपल्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये ही विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केली. *(43/21)* ती पुढील शब्दात :-

"No ground for interference is made out in exercise of our jurisdiction under Article 136 of the Constitution of India. **The special leave petition is accordingly dismissed.** Pending application, if any, stands disposed of."

**१६.२३** मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका डिसमिस केली इतकेच नव्हे तर अशा प्रकारची अनावश्यक प्रकरणे विशेष अनुमती याचिका म्हणून सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाने दाखल करू नये असेही ताशेरे ओढले. कोणतेही पुरेसे कारण नसतांना अनेक विशेष अनुमती याचिका अनेक प्रकरणांमध्ये दाखल केल्याचे आमच्या लक्षात आलेले आहे. आमच्या या आदेशाची प्रत राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविण्यात यावी. मुख्य सचिवांनी यामध्ये लक्ष घालून अनावश्यक विशेष अनुमती याचिका दाखल होणार नाहीत हे पहावे व त्याबाबतीत काय कृती केलेली आहे, हे दोन महिन्याच्या आत सर्वोच्च न्यायालयाला कळवावे असेही त्या दिवशीच्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. हे नमूद असलेला परिच्छेद ३ शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"We feel that the State Government should not file such cases in this Court, filing of which are uncalled for. We have seen large number of cases are being filed without any sufficient reason.** State bodies should not file unnecessary litigation. A copy of the order be sent to the Chief Secretary of the concerned State. Let the Chief Secretary of the State look into the matter and see that no matter is filed unnecessarily. **Report of action taken be submitted by the Chief Secretary, State of Maharashtra, to this Court within two months from today."**

**१६.२४** मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पारित झाल्यानंतर दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांनी "Precautions to be taken by the Government Departments while filing Special Leave Petition before the Hon'ble Supreme Court of India" या मथळ्याचे एक परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांना पाठविले. *(44/21)* या परिपत्रकातील परिच्छेद २ पुढीलप्रमाणे :-

"The Hon'ble Supreme Court has ordered and directed that the State Government should not file cases before the Hon'ble

Court, filing of which is uncalled for. The Hon'ble Court further observed that a large number of cases are being filed without any sufficient reason, and that State bodies should not file unnecessary litigation. The Hon'ble Supreme Court has observed and directed inter-alia as under:-

***"2. No ground for interference is made out in exercise of our jurisdiction under Article 136 of the Constitution of India. The special leave petition is accordingly dismissed. Pending application, if any, stands disposed of.***

***3. We feel that the State Government should not file such cases in this Court, filing of which are uncalled for. We have seen large number of cases are being filed without any sufficient reason. State bodies should not file unnecessary litigation. A copy of the order be sent to the Chief Secretary of the concerned State. Let the Chief Secretary of the State look into the matter and see that no matter is filed unnecessarily."***

**१६.२५** याच परिपत्रकाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे.:-

"In view of the aforesaid directions of the Hon'ble Court, all the departments are hereby directed to carefully examine the matters before forwarding a proposal for filing of Appeal/ Revision or other proceedings against the orders passed by a Court or Tribunal. An endeavour shall be made to avoid filing of unnecessary litigation. The Departments are directed to ensure that the recourse to the remedy of Appeal/Revision etc. shall be made in only those cases where there are sufficient and justifiable grounds/reasons for filing of Appeal/Revision or other proceedings."

**१६.२६** राज्याच्या मुख्य सचिवांनी उपरोक्त प्रमाणे आदेश काढल्यानंतर सुद्धा उच्च शिक्षण विभागामध्ये कोणतीही वर्तनदुरुस्ती झाल्याचे दिसून येत नाही. खरे म्हणजे यापूर्वी सुद्धा राज्याच्या मुख्य सचिवांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ रोजी **"Directions for adherence to General Judicial Principle in service matters"** या मथळ्याचे एक परिपत्रक काढले होते. *(23/21)* त्या परिपत्रकामध्ये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने अशाच प्रकारचे आदेश दिलेले होते.

**१६.२७** याच २८ फेब्रुवारी २०१७ या परिपत्रकामध्ये मुख्य सचिवांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा याबाबतीत "State of Uttar Pradesh & Ors Vs. Arvind Kumar Srivastava reported in 2015 (1) SCC 347" या प्रकरणात दिलेला निर्णय पुढीलप्रमाणे उधृत केलेला होता. :-

"Normal rule is that when a particular set of employees is given relief by the Court, **all other identically situated persons need to be treated alike by extending that benefit. Not doing so would amount to discrimination and would be violative of Article 14 of the Constitution of India.** This principle needs to be applied in service matters more emphatically as the service jurisprudence evolved by this Court from time to time postulates that **all similarly situated persons should be treated similarly.** Therefore, the normal rule would be that merely because other similarly situated persons did not approach the Court earlier, they are not to be treated differently".

**१६.२८** या संदर्भातील मा.उच्च न्यायालयाचा पहिला धोरणात्मक निर्णय व दुसरा धोरणात्मक निर्णय सन २०१० मध्ये झालेला आहे. परंतु सन २०२४ पर्यंत म्हणजे गेल्या १४-१५ वर्षात उच्च शिक्षण विभागाने याबाबतचा धोरणात्मक शासननिर्णय अजूनही निर्गमित केलेला नाही. एक एका शिक्षकाला बोलावून त्याच्याशी 'अर्थपूर्ण चर्चा' करणे, त्यानंतर तो राजी झाल्यास ते प्रकरण निकाली काढणे, असे करीत असतांना उच्च न्यायालयातून निर्णय झालेल्या शिक्षकांच्या बाबतीत त्या शिक्षकांपुरतेच आदेश काढणे, इतर शिक्षकांना 'फिरवत' ठेवणे हा कार्यक्रम उच्च शिक्षण विभागामध्ये सर्व स्तरावर व्यापक प्रमाणात सुरू होता व आहे.

**१६.२९** लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून दोन सहसंचालक पकडल्या गेले हे खरे असले तरी तत्सम प्रकारामध्ये गुंतलेल्या कारभाऱ्यांची संख्या फार मोठी होती असे दिसून येते. या प्रकाराचे कसे वर्णन करावे हे सूचत नसतांना केंद्रशासनातील एक ज्येष्ठ मंत्री मा.श्री.नितिनजी गडकरी यांनी जाहिरपणे या प्रकाराचे अतिशय रास्त वर्णन केलेले आहे ते पुढीलप्रमाणे :- "तीन-तीन महिने आमचे काही अधिकारी फाईल दाबून ठेवतात. आमच्याकडे काही अधिकारी न्युटनचे बाप आहेत. जेवढं जास्त वजन टाकाल तेवढी फाईल जोरात धावते." असे या प्रकाराचे वर्णन त्यांनी केलेले आहे आणि म्हणून यापुढे या निवेदनामध्ये या प्रकाराचा "फाईलवर वजन टाकणे" असाच उल्लेख केलेला आहे.

**१६.३०** मा.श्री.नितिनजी गडकरी यांनी तीन-तीन महिने आमचे काही अधिकारी फाईल दाबून ठेवतात असा उल्लेख केलेला आहे. इथे मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम शब्द त्यांच्या बाजूने असतांना १४२९ लोकांची फाईल १४ वर्षे दाबून ठेवलेली आहे. काही मोजक्या लोकांनी फाईलवर वजन टाकून आपले प्रस्ताव मंजूर करून घेतले हे खरे असले तरी बहुसंख्य शिक्षकांनी विधिमय मार्गाचाच वापर करण्याचा निर्धार केला व न्यायालयाच्या मार्गाने न्याय मिळविला आहे. महाराष्ट्रामध्ये अशा शिक्षकांची संख्या ७२९ आहे.

**१६.३१** विधिमय मार्गाचाच वापर करण्याचा निर्धार केलेल्या मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील अशा १७ शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली याचिका म्हणने सन २०२० ची याचिका क्रमांक (L) ७५०२ होय. हे सारे शिक्षक एम.फील. पदवी धारक असून इतर अनेक एम.फील. पदवी धारकांना जशी नेट-सेटपासून मुक्तता देण्यात आलेली आहे तशी ती मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आम्हालाही देण्यात यावी अशा प्रकारची मागणी या याचिकेतून करण्यात आलेली आहे. या याचिकेसोबत विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या त्यांच्या भागामध्ये एम.फील. पदवी धारक शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ लागू केलेले आहेत. अशा ७२९ शिक्षकांची यादी याचिकाकर्त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये मिळविलेली असून त्यांची विभागनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे. सुरुवातीला अनुक्रमांक दिला असून त्यानंतर विभागीय सहसंचालकांचा विभाग आहे व शेवटी लाभधारक शिक्षकांची संख्या नमूद केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| (१) सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर..... | १५ |
| (२) सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर..... | १० |
| (३) सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग..... | ३२९ |
| (४) सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे..... | ९६ |
| (५) सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव..... | ५६ |
| (६) शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड.... | ९७ |
| (७) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग.... | १२६ |
| **एकूण** | ७२९ |

दिनांक १.१.१९९४ ते २००९ अखेर पर्यंतच्या काळातील उपरोक्त आकडेवारी माहितीच्या अधिकारात याचिकाकर्त्यांना उपलब्ध झालेली आहे. ती या याचिकेसोबत सहपत्र 'जी' म्हणून जोडलेली आहे. काही विभागांची माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते.

**१६.३२** या सर्व कालखंडामध्ये उच्च शिक्षण विभागाने व उच्च शिक्षण संचालनालयाने मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी धोरणात्मक निर्णय दिलेले असतांना व तसा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला असतांना धोरणात्मक शासननिर्णय काढण्याचे उच्च शिक्षण विभागाने कटाक्षाने टाळले असे दिसून येते. तसे करणे हा सुद्धा उच्च शिक्षण विभागाचा एक धोरणात्मक निर्णयच होता. एक एका शिक्षकाला आपल्या दरबारी बोलावून त्या एक एकट्याची फाईल तपासणे व फाईलचे कमी जास्त वजन पाहून निर्णय घेणे यात जो आनंद आहे तो आनंद उच्च शिक्षण विभागाला धोरणात्मक निर्णय घेतल्याने होत नाही आणि म्हणून मग एक अतिशय विपरित अशा प्रकारचा निर्णय या कालखंडामध्ये उच्च शिक्षण विभागाकडून काढल्या गेल्या.

**१६.३३** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांच्या निर्देशावरून दिनांक २७ जानेवारी २०२१ रोजी या विभागातील एक अवर सचिव श्री. विजय साबळे यांनी एक परिपत्रक *(38/21)* काढले. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शेकडो एम.फील धारकांना मिळत असलेले लाभ काढून घेण्यात यावेत असे या आदेशाच्या परिच्छेद ७ मध्ये नमूद आहे ते पुढीलप्रमाणे :-

**"सबब अनुज्ञेय नसताना बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना एम.फील. अर्हता गृहित धरून चूकीच्या पद्धतीने कॅसचे लाभ दिलेले आहेत, अशा सर्व अधिव्याख्यात्यांचे लाभ काढून घेण्यात यावेत."**

**१६.३४** या परिपत्रकाचा हेतू लाभ मिळालेल्या एम.फील धारक शिक्षकांनासुद्धा व्यक्तिशः आपल्या फाईली घेऊन फिरायला लावणे हाच होता याविषयी काही शंका नाही आणि मग त्या एक एका शिक्षकांची फाईल तपासण्याचा आनंद मंत्रालयीन व संचालनालयीन अधिकारी घेणार होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली या सर्व शिक्षकांनी संघटितपणे या हल्ल्याला तोंड देण्याचे ठरविले. दिनांक १० मार्च २०२१ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाच्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :-

"लाभधारक शिक्षकांचे लाभ काढून घेण्याची कार्यवाही सहसंचालकांनी ज्या ठिकाणी सुरू केली असेल त्या प्रत्येक ठिकाणी लाभधारक शिक्षकाने आपल्या प्राचार्यांमार्फत सहसंचालकांना एक 'नोटीस निवेदन' देऊन याबाबतची कायदेशीर स्थिति त्यांच्या लक्षात आणून द्यावी असा निर्णय घेण्यात आला. **(i)** या नोटीस निवेदनाचा नमुना डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी तयार करावा. **(ii)** महासंघाच्या पाच सदस्यीय विधी समितीने या नोटीस निवेदनाचा नमुना संमत केल्यानंतर **(iii)** संघटनेचे सरकार्यवाह प्रा.डॉ.एस.पी.लवांदे यांनी तो सर्व घटक संघटनांच्या प्रतिनिधीकडे ताबडतोब प्रसृत करावा असाही निर्णय घेण्यात आला."

**१६.३५** महासंघाच्या नेतृत्त्वाखाली या शिक्षकांनी नोटिसा देण्याची कारवाई पूर्ण केली. *(48/21)* त्याचा फायदा असा झाला की, एकाही शिक्षकापासून रिकव्हरी उच्च शिक्षण विभागाला काढता आली नाही व उच्च शिक्षण विभागाला मूग गिळून बसावे लागले. उच्च शिक्षण विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२१ रोजीच्या अशा सर्व अधिव्याख्यात्यांचे सर्व लाभ काढून घेण्यात यावेत या आदेशाची २०२४ पर्यंत एकाही शिक्षकाच्या बाबतीत अंमलबजावणी या विभागाला करता आली नाही. खरे म्हणजे उच्च शिक्षण विभागाचा 'गौरव' वाढविणारी ही 'लज्जास्पद' कारवाई म्हणावी लागेल.

**१६.३६** या निमित्ताने का होईना मा.उच्च न्यायालयाचा दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजीचा W.P.No.1213 of 2009 या प्रकरणातील निर्णय उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून देण्यात आला होता. या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ११ जुलै २०१८ रोजी फेटाळून लावली. तसे करतांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या परिच्छेद २ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद होते.:-

"No ground for interference is made out in exercise of our jurisdiction under Article 136 of the Constitution of India. **The special leave petition is accordingly dismissed.** Pending application, if any, stands disposed of." *(43/21)*

**१६.३७** याच निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, :-

"3. We feel that the State Government should not file such cases in this Court, filing of which **are uncalled for. We have seen large number of cases are being filed without any sufficient reason.** State bodies should not file unnecessary litigation. A copy of the order be sent to the Chief Secretary of the concerned State. Let the Chief Secretary of the State look into the matter and see that no matter is filed unnecessarily. Report of action taken be submitted by the Chief Secretary, State of Maharashtra, to this Court within two months from today." *(43/21)*

**१६.३८** दिनांक २७ जानेवारी २०२१ रोजीचा उच्च शिक्षण विभागाचा आदेशच मुळात वाईट हेतूने काढण्यात आलेला होता आणि उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी अवमान त्यातून बटबटीतपणे दिसून येत होता. कसे का असेना पण या निमित्ताने या शिक्षकांनी ज्या नोटिसा दिल्या त्यामुळे उच्च न्यायालयाच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची माहिती उच्च शिक्षण विभागाला झाली. पण उच्च शिक्षण विभागाने आपले वर्तन दुरुस्त केले नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत दिलेल्या आदेशामुळे राज्याच्या मुख्य सचिवांनी दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी "Precautions to be taken by the Government Departments while filing Special Leave Petition before the Hon'ble Supreme Court of India" या मथळ्याचे एक परिपत्रक *(44/21)* काढले व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या या परिपत्रकात उधृत करून परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले.:-

"In view of the aforesaid directions of the Hon'ble Court, all the departments are hereby directed to carefully examine the matters before forwarding a proposal for filing of Appeal/Revision or other proceedings against the orders passed by a Court or Tribunal. An endeavour shall be made to avoid filing of unnecessary litigation. The Departments are directed to ensure that the recourse to the remedy of Appeal/Revision etc. shall be made in only those cases where there are sufficient and justifiable grounds/reasons for filing of Appeal/Revision or other proceedings."

पण मुख्य सचिवांच्या या परिपत्रकानंतर सुद्धा उच्च शिक्षण विभाग शुद्धीवर आला नाही.

**१६.३९** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश, त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णयावर शिक्कामोर्तब केलेले. असे असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले. त्यांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात "**(ब) अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली. उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा धोरणात्मक निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. *(155/24)* समजला असल्यास "धोरणात्मक शासननिर्णय काढण्यात काही 'मजा' नाही." एक एक प्रकरण तपासण्यात असलेली मजा अवर्णनीय आहे. हा त्यांचा समज भारी पडला.

**१६.४०** अलीकडे आता ती पद्धती बंद झालेली दिसते. पण पूर्वीच्या काळात दुय्यम निबंधकाच्या कचेरीत दस्तऐवज नोंदवितांना "**हे खरेदीखत नशापाणी न घेता मी अक्कलहुशारीने लिहून दिले आहे.**" असे एक वाक्य नोंदविलेल्या प्रत्येक दस्तऐवजात समाविष्ट करण्याचा शिरस्ता होता. कोणताही शासन आदेश काढतांना आता यापुढे "**हा शासन आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याने नशापाणी न घेता पूर्णपणे सावध स्थितीमध्ये व अक्कल हुशारीने हा शासन आदेश काढलेला आहे.**" असे वाक्य उच्च शिक्षण विभागाच्या प्रत्येक शासन आदेशाच्या शेवटी टाकण्याचा नवीन शिरस्ता निर्माण करण्याची गरज आहे असे वाटावे इतका हास्यास्पद, पोरकट व निर्बुद्धपणाचा एक शासन आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या एका उपसचिवांनी दिनांक २७ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित केलेला आहे.

**१६.४१** महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक यांनी एम.फील झालेल्या अलाभान्वित शिक्षकांसमोर केलेले एक भाषण समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसृत झालेले आहे. हे भाषण काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसून येते की, मा.उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय अजिबात न पाहता त्यांनी हे भाषण केलेले आहे. याबाबतच्या घटनेतील तरतुदी सुद्धा त्यांनी वाचलेल्या नाहीत असे दिसून येते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी संचालक उच्च शिक्षण, पुणे यांना एक पत्र पाठवून त्यांच्या भाषणाची ध्वनिचित्रफीतीवरून शब्दशः तयार केलेली मुद्रित प्रत सोबत जोडून या बाबी त्यांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत व त्यांना पुढीलप्रमाणे विनंती केलेली आहे. :-

"२. आपण ही मुद्रित प्रत काळजीपूर्वक पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की, मा.उच्च न्यायालयाच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या संपूर्णपणे विरोधात आपले हे प्रतिपादन आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने मा.उच्च न्यायालयात वेळोवेळी घेतलेली भूमिका आपण त्या सर्व प्रकरणांमध्ये एक प्रतिवादी असल्यामुळे आपणाला पूर्णपणे अवगत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याबाबतीत शपथपत्र दाखल करून उच्च न्यायालयामध्ये एक निश्चित भूमिका घेतलेली आहे. त्याबाबतीत फोनवरून बोलणे, पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव पाठविणे हे निरर्थक व निरुपयोगी आहे हे त्यांच्या लक्षात येऊ नये याचे आश्चर्य वाटते."

**१६.४२** "उच्च शिक्षण संचालकांनी एम.फील शिक्षकांसमोर केलेले प्रतिपादन" असा त्यांच्या भाषणाला डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी मथळा दिलेला असून त्या मथळ्याखाली त्यांचे भाषण शब्दशः नमूद केलेले आहे व त्यांचे ते भाषण शब्दशः बिनचूक मुद्रित झालेले आहे याची मी स्वतः ध्वनिचित्रफीतीवरून खात्री करून घेतलेली आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह यांचे ते पत्र व त्या पत्रासोबत जोडलेले भाषण सोबत **परिशिष्ट : एक** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**१६.४३** उच्च शिक्षण संचालकांनी हे जे भाषण केलेले आहे, या भाषणातील काही मुक्ताफळे पुढीलप्रमाणे आहेत.:-

*(१) "चंद्रकांतदादा पाटील साहेबांनी याच्यावरती थेट ॲक्शन घेण्याच्या दृष्टीकोनातून यूजीसी चेअरमन बरोबर पहिले फोन वरती बोलले.*

*(२) त्यानंतर मुंबईला आपण एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये चेअरमन साहेब म्हणाले आम्ही २०१० लाच हा प्रश्न संपविलेला आहे. आम्ही एकदाच ते ....... केलं. आम्ही आता देणार नाही.*

*(३) मंत्रीमहोदयांनी त्यांना विनंती अशी केली की, तुम्ही एकदा दिलं. आमच्याकडच्या अनेक प्राध्यापकांचा प्रश्न अडलेला आहे त्यामुळे कृपया अजून एक संधी द्यावी.*

*(४) त्यांनी सांगितलं की ठीक आहे आपण तीन स्टेप ठरवू. पहिल्या स्टेपमध्ये संचालक उच्च शिक्षण यांनी संपूर्ण राज्यभरातून प्रस्ताव एकत्रित करायचे. किती प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव आम्हाला पाठवायचे.*

*(५) यूजीसी सेकंड स्टेपमध्ये कमिटी कॉन्स्टिट्यूट करेल आणि थर्ड स्टेपमध्ये आपण तो निर्णय घेऊ.*

*(६) हे पहिल्यांदा १४ वर्षामध्ये यूजीसी बरोबरचा आपला डायरेक्ट संवाद झाल्यामुळे यूजीसी नी ही गोष्ट मान्य केली. त्यानुसार आपण परिपत्रक काढल.*

**( परिशिष्ट एक : परिच्छेद १६.४१ ते १६.५२ पहा )**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)**
**University Club House, B-Road, Charchgate, Mumbai-400 020**
*Registered Under Trade Union Act 1926*
*No. by II-8162 of 1985*

PRESIDENT
**Prof. Dr. S. P. Lawande**

GENERAL SECRETARY
**Prof. Dr. P. B. Raghuwanshi**
Buty Plot, Near Mahjan Wadi, Rajapeth,
Amravati – 444601
Email : pbraghuwanshi@gmail.com
Mob.- 09422155603

*Ref. No. MFUCTO/13/2024*
**दिनांक :** १९ सप्टेंबर २०२४

प्रति,

**मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे**

**मार्फत :** मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**विषय :** एम.फील पदवी धारक शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे कायदेशीर व न्यायालय मान्य लाभ न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष.

मा.महोदय,

अशा शिक्षकांच्या एका समुहासमोर आपण केलेले भाषण त्यातील काही शिक्षकांनी माझ्याकडे पाठविले असून त्या ध्वनिचित्रफितीचे मी काळजीपूर्वक अवलोकन केलेले आहे. तुमचे हे भाषण ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या या भाषणाच्या ध्वनिचित्रफित प्रती वरून शब्दशः तयार केलेली मुद्रित प्रत मी या पत्राच्या सोबत जोडत आहे.

**२.** आपण ही मुद्रित प्रत काळजीपूर्वक पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की, मा.उच्च न्यायालयाच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या संपूर्णपणे विरोधात आपले हे प्रतिपादन आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने मा.उच्च न्यायालयात वेळोवेळी घेतलेली भूमिका आपण त्या सर्व प्रकरणांमध्ये एक प्रतिवादी असल्यामुळे आपणाला पूर्णपणे अवगत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याबाबतीत शपथपत्र दाखल करून उच्च न्यायालयामध्ये एक निश्चित भूमिका घेतलेली आहे. त्याबाबतीत फोनवरून बोलणे, पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव पाठविणे हे निरर्थक व निरुपयोगी आहे हे आपल्या लक्षात येऊ नये याचे आश्चर्य वाटते.

**३.** मुद्दाम आपणास पत्र लिहून कळविण्याचे कारण असे की, सदरहू प्रकरणामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने शपथपत्रावर न्यायालयात घेतलेली भूमिका व मा.उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेऊन आपण चुकीच्या मार्गावरून जाण्याचे टाळावे अशी आपणास विनंती आहे.

आपला विनीत
**डॉ.प्रवीण रघुवंशी**

**सहपत्र :** ध्वनिचित्रफितीवरून तयार केलेली भाषणाची मुद्रित प्रत.

## *उच्च शिक्षण संचालकांनी एम.फील शिक्षकांसमोर केलेले प्रतिपादन*

**"चंद्रकांतदादा पाटील साहेबांनी याच्यावरती थेट ॲक्शन घेण्याच्या दृष्टीकोनातून यूजीसी चेअरमन बरोबर पहिले फोन वरती बोलले.** त्यानंतर मुंबईला आपण एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये चेअरमन साहेब म्हणाले आम्ही २०१० लाच हा प्रश्न संपविलेला आहे. आम्ही एकदाच ते ....... केलं. आम्ही आता देणार नाही. मंत्रीमहोदयांनी त्यांना विनंती अशी केली की, तुम्ही एकदा दिलं. आमच्याकडच्या अनेक प्राध्यापकांचा प्रश्न अडलेला आहे त्यामुळे कृपया अजून एक संधी द्यावी. त्यांनी सांगितलं की ठीक आहे आपण तीन स्टेप ठरवू. पहिल्या स्टेपमध्ये संचालक उच्च शिक्षण यांनी संपूर्ण राज्यभरातून प्रस्ताव एकत्रित करायचे. किती प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव आम्हाला पाठवायचे. यूजीसी सेकंड स्टेपमध्ये कमिटी कॉन्स्टिट्यूट करेल आणि थर्ड स्टेपमध्ये आपण तो निर्णय घेऊ. हे पहिल्यांदा १४ वर्षामध्ये यूजीसी बरोबरचा आपला डायरेक्ट संवाद झाल्यामुळे यूजीसी नी ही गोष्ट मान्य केली. त्यानुसार आपण परिपत्रक काढल. आपण ते सगळे ३२ कॉलम दिले. त्यानुसार एकूण १४२९ जणांचे प्रस्ताव आपल्याकडे आले. आपल्या सर्व अकृपीविद्यापीठांमधनं एकूण प्रस्तावांची संख्या १४२९ होती. हाच प्रस्ताव आपण शासनाला कम्युनिकेट केला.

**प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आपले विकासचंद्र रस्तोगी साहेब यांनी एक पत्र जे आहे ते पत्र यूजीसी चेअरमनला लिहिलं.** ते पत्र यूजीसीला प्राप्त झाल. त्यानुसार आपण त्यांना सांगितलं की प्रस्ताव आमच्याकडे आलेले आहेत. आता कमिटी आपल्याला कॉन्स्टिट्यूट करायची आहे. आता जेव्हा आपले प्रतिनिधी आलेले होते त्या प्रतिनिधींना आपण मोबाईलवरती यूजीसी चेअरमन मनीष जोशी साहेबांना फोन लावला स्पीकरवरती ठेवला तो फोन सर्वांनी ऐकला. त्यांनी सांगितलं की, आम्हाला महाराष्ट्र शासनाचं पत्र हे मिळालेलं आहे. आमची कमिटी कॉन्स्टिट्यूट झालेली आहे फक्त आता सध्या दोन ते तीन दिवसामध्ये पत्र निर्गमित केलं जाईल त्यामध्ये सर्व प्रस्ताव जे आहेत दिल्लीलाच बैठका होतील आणि तात्काळ प्रत्येक विद्यापीठाच्या रजिस्ट्रारला ते ते प्रस्ताव घेऊन प्रपोजल घेऊन आमच्यासमोर प्रेझेंटेशनसाठी यावं लागेल आणि लवकरावत लवकर हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढू.

**हा केंद्रसरकारचा प्रश्न आहे, यूजीसीचा प्रश्न आहे त्यामुळे त्यांच्यावतीने मी सांगणार नाही आहे आता खुद्द मनीष जोशी साहेबांनी स्पीकर फोनवरती ही माहिती सर्व प्रतिनिधींना दिली आहे. सर्व प्रतिनिधी होते. त्यांनी सगळ्यांनी ते ऐकलं.** काही जणांनी रेकॉर्डपण केलं त्यामुळे त्याच्यामध्ये आम्ही त्यांना नेहमी सांगितलं आम्ही अत्यंत ट्रान्सपरन्ट आहोत. तुम्हाला काही सांगायचं आणि आम्ही काय करायचं अस आमचं अजिबात धोरण नाही आहे. ह्या सगळ्या संघर्षामध्ये आम्ही तुमच्या बरोबर आहोत. आपल्याला हे यूजीसी कडनं ह्या सगळ्या गोष्टी घ्यायच्या आहेत. बॉल आता यूजीसीच्या कोर्टामध्ये आहे. यूजीसी लवकरात लवकर कमिटी कॉन्स्टिट्यूट करेल. आमच्या सगळ्यांची इच्छा आहे हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघाला पाहिजे. थँक्यू व्हेरी मच."

*(७) आपण ते सगळे ३२ कॉलम दिले. त्यानुसार एकूण १४२९ जणांचे प्रस्ताव आपल्याकडे आले. आपल्या सर्व अकृपीविद्यापीठांमधनं एकूण प्रस्तावांची संख्या १४२९ होती. हाच प्रस्ताव आपण शासनाला कम्युनिकेट केला."*

**१६.४४** राज्याच्या विद्वान उच्च शिक्षण संचालकांनी उधळलेली उपरोक्त सात मुक्ताफळे वर नमूद केलेली आहेत. तसे करतांना त्यांनी श्री.चंद्रकांतदादा पाटील साहेब यांनाही या अपकृत्यामध्ये गोवले आहे. मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात विद्यापीठ अनुदान आयोगाने जी शपथपत्रे दाखल केलीत त्यामध्ये **विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका ही "कायद्याचा अंतिम शब्द" या दर्जाला पात्र झालेली आहे** कारण उच्च न्यायालयाच्या धोरणात्मक निर्णयानुसार आयोगाने घेतलेला तो धोरणात्मक निर्णय आहे. पुढे त्यानुसार मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी तत्सम निर्णय दिलेले आहेत. एवढेही ज्ञान नसलेल्या उच्च शिक्षण संचालकांनी उच्च शिक्षण मंत्र्यांना यूजीसी चेअरमन बरोबर फोनवर बोलण्याचा सल्ला देणे व तो सल्ला शिक्षणमंत्र्यांनी मान्य करून चेअरमन बरोबर तसे बोलणे म्हणजे उच्च शिक्षण विभागाचे कर्मच फुटले असे म्हणावे लागेल. या सर्व घडामोडीतून शासननिर्णय नसतांना, विद्यापीठ अनुदान आयोगाने तसे सांगितलेले नसतांना, कोणत्याही न्यायालयाच्या निर्णयामध्ये तसे नमूद नसतांना **"३२ कॉलमचे लचांड"** जन्माला आले आणि फाईल वजनदार करण्यासाठी ३२ कॉलम अपुरे वाटतात म्हणून की काय? असे १४२९ शिक्षकांचे प्रस्ताव 'आपल्याकडे आलेले आहे.' हे सर्व काम मा.उच्च न्यायालयाच्या मा.सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेल्या निर्णयाच्या विरोधात आहे आणि उच्च शिक्षण विभागाला दीर्घकाळ फाईल वजनदार करण्याचे भरपूर काम उपलब्ध करून देणारे आहे.

**१६.४५** "आम्ही हा प्रश्न २०१० मध्ये संपविलेला आहे. " असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणतात तेव्हा त्यांनी तो कसा संपविला आहे? **याचे तपशील उच्च शिक्षण संचालकांनी मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना दाखविले नाही व त्यातुनच "आमच्याकडे अनेक प्राध्यापकांचा प्रश्न अडलेला आहे. त्यामुळे कृपया तुम्ही एक संधी द्यावी" अशी भिक मागण्याची वेळ राज्याच्या उच्च शिक्षणमंत्र्यांवर यावी ही अतिशय लज्जास्पद गोष्ट आहे.** सन २०१० मध्ये उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय दिला. त्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने धोरणात्मक निर्णय घेतला. त्यानुसारच २०१० मध्ये उच्च न्यायालयाचा दुसरा धोरणात्मक निर्णय झाला. **त्याची अंमलबजावणी १४ वर्षे न करण्याचे लज्जास्पद कृत्य उच्च शिक्षण विभागाच्या हातून घडलेले आहे. असे असतांना "पहिल्यांदा १४ वर्षामध्ये यूजीसी चेअरमन बरोबर आपला डायरेक्ट संवाद झाल्यामुळे यूजीसीनी ही गोष्ट मान्य केली. त्यानुसार आपण परिपत्रक काढले" अशी फुशारकी उच्च शिक्षण विभागाचे संचालक मारतात. यापेक्षा लाजीरवाणे कृत्य काय असू शकते?**

**१६.४६** उच्च शिक्षण संचालकांच्या भाषणातील मजकूर पाहिला तर या अपकृत्यामध्ये उच्च शिक्षण सचिव श्री.रस्तोगी यांना सुद्धा संचालकांनी गुरफटलेले आहे. भाषणातील तो भाग पुढीलप्रमाणे आहे :-

*(८) "प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आपले विकासचंद्र रस्तोगी साहेब यांनी एक पत्र जे आहे ते पत्र यूजीसी चेअरमनला लिहिलं. ते पत्र यूजीसीला प्राप्त झाल. त्यानुसार आपण त्यांना सांगितलं की प्रस्ताव आमच्याकडे आलेले आहेत. आता कमिटी आपल्याला कॉन्स्टिट्यूट करायची आहे.*

*(९) आता जेव्हा आपले प्रतिनिधी आलेले होते त्या प्रतिनिधींना आपण मोबाईलवरती यूजीसी चेअरमन मनीष जोशी साहेबांना फोन लावला स्पीकरवरती ठेवला.*

*(१०) तो फोन सर्वांनी ऐकला. त्यांनी सांगितलं की, आम्हाला महाराष्ट्र शासनाचं पत्र हे मिळालेलं आहे. आमची कमिटी कॉन्स्टिट्यूट झालेली आहे फक्त आता सध्या दोन ते तीन दिवसामध्ये पत्र निर्गमित केलं जाईल त्यामध्ये*

*(११) सर्व प्रस्ताव जे आहेत दिल्लीलाच बैठका होतील आणि तात्काळ प्रत्येक विद्यापीठाच्या रजिस्ट्रारला ते प्रस्ताव घेऊन प्रपोजल घेऊन आमच्यासमोर प्रेझेंटेशनसाठी यावं लागेल आणि लवकरावत लवकर हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढू."*

**१६.४७** विद्वान उच्च शिक्षण संचालकांच्या भाषणाची संपूर्ण प्रत विनचूकपणे उपलब्ध करून दिल्याबद्दल महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सर्वांनी आभार मानले पाहिजे. ते भाषण सर्वांनी मुळातून वाचले पाहिजे म्हणजे त्यांच्या असे लक्षात येईल की, **भारतीय संविधानाने उपलब्ध न करून दिलेली एक नवीन व्यवस्था उच्च शिक्षण संचालकांच्या संशोधक वृत्तीमुळे शिक्षकांना आता उपलब्ध झालेली आहे. एखादा विभाग घटनेप्रमाणे, कायद्याप्रमाणे, नियमाप्रमाणे वागत नसेल तर ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्या व्यक्तींनी उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात जाऊन, निर्णय त्यांच्या बाजूने होऊन सुद्धा न्याय त्यांच्या पदरी पडत नसेल तर** "त्यासाठी सर्वप्रथम त्यांनी उच्च शिक्षण संचालकांची भेट घ्यावी. त्यांच्या सल्ल्यावरून उच्च शिक्षण सचिव हे यूजीसीला पत्र लिहितील. ते पत्र यूजीसीला प्राप्त होईल. आता ते कमिटी कॉन्स्टिट्यूट करतील असे यूजीसीमधील कोणीतरी मोबाईलवर सांगतील. त्यावेळेला मोबाईल स्पीकरवर ठेवल्या जाईल. एम.फील केले असूनही मा.उच्च न्यायालयाचा व सर्वोच्च न्यायालयाचा त्यांना अनुकूल निर्णय झालेला असतांना अलाभान्वित राहिलेला एम.फील पात्रताधारक शिक्षकवृंद समोर बसलेला असेल आणि मग मोबाईलवरच्या संभाषणात त्यांना असे कळविले जाईल की, आता दिल्लीतच बैठका होतील आणि प्रत्येक विद्यापीठाच्या रजिस्ट्रारला ते प्रस्ताव घेऊन आमच्या समोर म्हणजे आयोगासमोर प्रेझेंटेशनसाठी याव लागेल."

**१६.४८** विशेष गोष्ट अशी की, याच भाषणामध्ये उच्च शिक्षण संचालक या सर्व शिक्षकांना असे सांगतात की,

*(१२) "हा केंद्रसरकारचा प्रश्न आहे,*

*(१३) यूजीसीचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांच्यावतीने मी सांगणार नाही.*

*(१४) आता खुद्द मनीष जोशी साहेबांनी स्पीकर फोनवरती ही माहिती सर्व प्रतिनिधींना दिली आहे.*

*(१५) सर्व प्रतिनिधी होते. त्यांनी सगळ्यांनी ते ऐकलं.*

*(१६) बॉल आता यूजीसीच्या कोर्टामध्ये आहे. यूजीसी लवकरात लवकर कमिटी कॉन्स्टिट्यूट करेल.*

*(१७) आमच्या सगळ्यांची इच्छा आहे हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघाला पाहिजे."*

**१६.४९** चंद्रकांतदादा पाटील साहेब म्हणजे राज्याचे उच्च शिक्षणमंत्री यांनी थेट ॲक्शन घेण्याच्या दृष्टीकोनातून यूजीसी चेअरमन बरोबर पहिले फोन वरती बोलले. फोनवर बोलणे करण्याअगोदर उच्च शिक्षण संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजी आपल्या ४७१ व्या बैठकीत ताबडतोबच मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत असा निर्णय (*41/21*) घेतला. तो चंद्रकांत दादांना दाखवायला हवा होता. आयोगाच्या निर्णयातील या प्रकरणाशी संबंधित भाग पुढीलप्रमाणे :-

"(iii) The Commission further resolved that since both the above mentioned Regulations are prospective and not retrospective in nature, therefore, **all candidates having M.Phil degree on or before 10th July, 2009 shall remain exempted from the requirement of NET for the purpose of appointment as Lecturer/Assistant Professor."**

**१६.५०** "बॉल आता यूजीसीच्या कोर्टामध्ये आहे" असे उच्च शिक्षण संचालक म्हणतात. स्वतः प्रतिवादी असलेल्या खटल्यात उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय, त्यात आयोगाने दाखल केलेले शपथपत्र पहायला संचालकांना वेळ मिळाला नसेल. पण सध्या चालू असलेल्या प्रकरणामध्ये (ज्यात ते प्रतिवादी आहेत) त्यात आयोगाने दाखल केलेले शपथपत्र हे संचालकांच्या लक्षात असू नये हे अशोभनीय होय. मा.मुंबई उच्च न्यायालयासमोर ही सुनावणी सुरू असून मा.खंडपीठाने दिनांक २४ ऑगस्ट २०२१ रोजी (W.P. (L) No. 7502 of 2020) याबाबतीत जो आदेश पारित केला आहे त्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग या सहाव्या प्रतिवादीला आपल्या आदेशाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत. :-

"6. Respondent No. 6 shall clarify in the Affidavit proposed to be filed, whether the notification dated 4th April 2000 and the amendment thereto would apply with prospective effect or retrospective effect."

**१६.५१** मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशाप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने आयोगाच्या शिक्षाधिकारी डॉ.सुप्रिया दहिया यांनी आयोगाच्या वतीने शपथपत्र दाखल केलेले असून त्याच्या पहिल्याच परिच्छेदात पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे. :-

"2. I am filing the present short affidavit to place the stand of Respondent No. 6 UGC in the afore stated matter before this Hon'ble Court and more particularly to answer the question posed to the answering Defendant by this Hon'ble Court vide

Order dated 24.08.2021."

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक ०४.०४.२००० रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेची स्थिती काय आहे? हे या शपथपत्रामध्ये नमूद केलेले आहे ते पुढीलप्रमाणे :-

"Thus, the aforesaid provision makes it crystal clear that the said notification dated 4.04.2000 is not intended to have any retrospective effect."

**१६.५२** विद्यापीठ अनुदान आयोगाने याच शपथपत्रात दिनांक ०१.०६.२००९ च्या अधिसूचनेची स्थिती पुढील शब्दात नमूद केलेली आहे.:-

"It is stated that the Notifications provide that the Notifications *"shall come into force with immediate effect."* A bare perusal of the aforesaid provision contained in the **Notification makes it crystal clear that the Notifications shall only be applied prospectively to candidates who are appointed after the said Notifications are issued."**

## (१७)

**१७.** मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची दहादहा, बाराबारा वर्षे अंमलबजावणी न करणे हा उच्च शिक्षण विभागाचा अतिशय आवडता छंद झालेला आहे. "१० वर्षापेक्षा जास्त काळ झाला पण मा.उच्च न्यायालयाच्या तक्रार निवारक यंत्रणेबाबतच्या **(Grievance Redressal Mechanism)** निर्णयाची अंमलबजावणी नाही" या विषयावरील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय मला आपल्या लक्षात आणून द्यावयाचा आहे.

**१७.१** उच्च शिक्षण विभागाने घेतलेल्या काही निर्णयांमुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर व्यथित होण्याची पाळी आली असेल तर त्या व्यथेतून मुक्ती मिळविण्यासाठी आंदोलन करण्याशिवाय आज दुसरा कोणताही मार्ग शिक्षकांना उपलब्ध नाही. ही गोष्ट शिक्षक संघटनांनी वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली पण त्याबाबतीत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. सन २०१२ च्या याचिका क्रमांक १३२६ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक **१० मे २०१३** रोजी जो निर्णय दिला त्यातील परिच्छेद २४ पुढीलप्रमाणे आहे:-

"24. Whatever may be the reason for delay in taking the decision or justification or otherwise for not extending the cooperation to the examination related work, it is the students who are bound to suffer on account of such non-cooperation between the teachers and the authorities. We are therefore of the view that State Government should set up the **Grievance Redressal Mechanism** before which the teacher or their Association can raise their grievances or demands and after considering the recommendations of such body, the State Government or the University may take necessary decisions. It is on account of **absence of such mechanism** to get the disputes and grievances resolved and redressed that the present unfortunate agitation started. The Grievance Redressal Body should be set up by 31st July 2013."

**१७.२** मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने SLP दाखल केली नाही व या निर्णयातील बहुतेक आदेशांची अंमलबजावणी केली. मात्र उपरोक्त परिच्छेद २४ मधील आदेशाची आजपर्यंत म्हणजे १०-१२ वर्षापेक्षा जास्त काळ झाला तरी अंमलबजावणी केली नाही. याबाबत केवळ काही हास्यास्पद उपाययोजना करण्यात आल्या. त्यांची प्रथम माहिती घेऊ.

**१७.३** तक्रार निवारक यंत्रणा ३१ जुलै २०१३ पर्यंत स्थापन केल्या जाईल व त्यामुळे शिक्षकांवर आंदोलन करण्याची पाळी येणार नाही अशी एक मोठी समाधानाची भावना मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये निर्माण झालेली होती. पण दुर्दैवाने याबाबतीत जो शासननिर्णय निर्गमित करण्यात आला **त्या शासननिर्णयाने व्यथा निर्मिती यंत्रणेलाच व्यथा निवारक यंत्रणेची झूल पांघरण्यात आली.** २५ जुलै २०१३ च्या या शासननिर्णयाने निर्माण केलेल्या तक्रार निवारक यंत्रणेमध्ये निरनिराळ्या आठ सदस्यांचा समावेश करण्यात आलेला होता तो पुढीलप्रमाणे :-

"1. Hon'ble Minister (Higher & Technical Education) ....President

2. Hon'ble State Minister (Higher & Technical Education) ...Vice President

3. Principal Secretary (Higher & Technical Education) ...Member

4. Principal Secretary (Service)...Member

5. Principal Secretary (Finance)...Member

6. Principal Secretary (Planning)...Member

7.Principal Secretary (Law and Justice)...Member

8. Joint Secretary/Deputy Secretary (Vishi)...Member"

**१७.४** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यशासनाला एक निवेदन पाठवून या शासननिर्णयाबाबतची आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केलेली होती. त्या पत्रातील परिच्छेद ३, ४ व ५ पुढीलप्रमाणे आहेत:-

"3. **The entire teaching community in the State is shocked by the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee inasmuch as the creators of the grievance are assigned the role to act as arbitrators through the said Committee.**

4. **As your honour are fully aware that no decision in the Higher Education Department is taken without the approval of either the cabinet or the Minister of the cabinet rank holding the charge of the department of Higher Education.** In the mechanism constituted by the G.R., the Hon'ble Minister is occupying the post of Chairman of the Committee. The other members are mostly either instrumental in taking decision or are subordinate to the decision-makers. The present arrangement **is completely opposed to the concept of fair-play and justice and would only make a mockery of the Grievance Redressal Mechanism which the Hon'ble High Court had very thoughtfully and rightly directed to be constituted.**

5. **In fact, the Principal Secretary to Higher Education, Joint Secretary and Deputy Secretary in the Higher Education Department (Vishi) would be the answerable parties before the grievance redressal mechanism in respect of the grievances that MFUCTO may raise.** They cannot therefore be the members of such Committee. This arrangement would ask the very persons whose actions have resulted in the grievance to hold hearing and decide the matter."

**१७.५** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने २४ सप्टेंबर २०१३ च्या याच निवेदनात ही व्यथा निवारक यंत्रणा कशी असावी याबाबत सुद्धा या पत्राच्या परिच्छेद ६ मध्ये एक प्रस्ताव दिलेला होता. तो पुढीलप्रमाणे :-

"6. MFUCTO as a gesture of constructive contribution proposes that the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee should be of two or three retired Presiding Officers of the University & College Tribunals in Maharashtra who are either sitting Judges or retired Judges of the Hon'ble High Court at Bombay whose impartiality cannot be doubted by the parties."

**१७.६** दिनांक २५ जुलै २०१३ च्या शासननिर्णयान्वये स्थापन केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेबद्दल सर्व बाजूंनी तक्रारी आल्यात व जवळ जवळ ती यंत्रणा निरुपयोगी झाली. सन २०१३ पासून २०१६ पर्यंत या समितीने एकही तक्रार निकाली काढल्याचा इतिहास नाही. तेव्हा शासनाने या समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. दिनांक १० मार्च २०१६ रोजीच्या शासननिर्णयान्वये तक्रार निवारक यंत्रणा म्हणून एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली. ही विशेष समिती २०१३ च्या यंत्रणेपेक्षासुद्धा टाकावू यंत्रणा म्हणून सिद्ध

झाली. **पहिले कारण** म्हणजे ही समिती जवळ जवळ १८ ते २० सदस्यांची होती. **दुसरे असे की,** या यंत्रणेचे कार्यालय कोठे राहील व कार्यपद्धती कशी राहील याविषयीचा कोणताही उल्लेख या शासननिर्णयामध्ये नमूद नाही आणि त्यामुळेच सन २०१६ पासून तर आजपर्यंतच्या काळात ही समिती 'निष्काम' स्थितीत सुस्त पडून आहे. खुद्द या शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये विशेष बाब म्हणून एक बाब या समितीकडे सोपविली होती ती पुढीलप्रमाणेः-

"३. उपरोक्त नमूद बाबीव्यतिरिक्त दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीत परीक्षेच्या कामकाजावरील बहिष्कारात सहभागी झालेल्या शिक्षकांचे दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीचे वेतन बंद करण्याबाबत घेतलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग व शिक्षक संघटनांची भूमिका ऐकून घेऊन निर्णय घ्यावा."

**१७.७** हा जो विषय या समितीकडे सोपविला होता या एका विषयावर समितीने दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एकमताने निर्णय घेतला व त्या निर्णयाचे सुद्धा पुढे खूप धिंडवडे निघाले. समितीने घेतलेला हा निर्णय एकमताचा होता. समितीच्या निर्णयाला उचलून धरणारा व समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास बाध्य करणारा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिला. पण याचा त्या विशेष समितीला आनंद झाला नाही. उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही समितीच्या बैठकीला उपस्थित होते व तो एकमताचा निर्णय घेण्यामध्ये सहभागी होते. असे असूनही या दोघांनीही त्यांच्या एकमताच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयामध्ये पुनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल केली. आणखी विशेष गोष्ट अशी की, समितीने एकमताने घेतलेल्या निर्णयाच्या बाजूने उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात या दोन सदस्यांनी सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली. त्याहूनही आणखी विशेष बाब अशी की, राज्याचे वित्त सचिव हे या समितीचे सदस्य होते व एकमताने निर्णय घेण्यात ते सहभागी होते. पण त्यांची एक तपशीलवार नोट समितीच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झाली. सारांश काय तर या समितीचे अशा रीतीने धिंडवडे निघाले. **तक्रार निवारण यंत्रणेमध्ये तक्रारीचे जन्मदातेच जर समाविष्ट असतील तर परिणाम काय होतात याचे ही समिती म्हणजे उत्तम उदाहरण होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरसुद्धा यथोचित तक्रार निवारक यंत्रणा स्थापित होऊ नये व केवळ त्या आदेशाची थट्टा केली जावी ही गोष्ट अनुचित होय. अतएव यथोचित तक्रार निवारक यंत्रणा तातडीने स्थापित करण्यात यावी. ताबडतोबीची व्यवस्था म्हणून त्या त्या विभागाच्या न्यायाधिकरणाकडे सेवामुक्तीच्या प्रकरणाशिवाय मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार तक्रार निवारक यंत्रणा (Grievance Redressal Mechanism) म्हणून काम सोपविले जावे, अशी मागणी करण्यात आलेली आहे.**

**१७.८** सेवामुक्तीच्या तक्रारी व इतर प्रकारच्या तक्रारीची सुनावणी करणे व त्यावर निर्णय देणे हे एक प्रकारे न्यायिक स्वरूपाचे काम होय. सेवामुक्तीच्या तक्रारी ऐकण्यासाठीच्या यंत्रणेची निर्मिती दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी मा.मुख्यमंत्री व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यात झालेल्या पहिल्या मतैक्यपत्रातून अस्तित्वात आली. उभयपक्षी स्वाक्षरीत झालेल्या या मतैक्यपत्रामध्ये तिसऱ्या परिच्छेदाचा मथळा "Retrenchment cases of 1975" असा असून तो परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे. :-

"**3. Retrenchment cases of 1975 :** It was noted that the main reason why these cases (of 116 retrenched teachers) have remained pending is that **there is no legally constituted machinery to redress the grievances** of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated Colleges regarding their service conditions. **It was agreed that this lacuna will be removed by a suitable amendment of the University Acts.** The Chief Minister, however, observed that while undertaking this amendment, it ought to be ensured that the legal process does not become lengthy and dilatory and that the cases of disputes are settled promptly and, in any case, within a period of 2 months. **The details of the amendment will be speedily worked out."**

**१७.९** शासनाने एकदा मागणी सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर मान्य केल्यावर त्या मागणीच्या पूर्ततेसाठीचा शासननिर्णय निर्गमित करणे, अधिनियमाची किंवा सुधारणा अधिनियमाची (Amending Act) पूर्तता करण्याच्या प्रक्रिया पार पाडणे, याबाबतच्या कृती किती वेगाने मंत्रालयात पार पडतात? हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्या मागणीची पूर्तता करीत असतांना वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांना सेवेच्या काही नव्या संधी उपलब्ध होतील. (उदाहरण नमूद करावयाचे झाले तर राज्य निवडणूक आयोग स्थापित होत असतांना केलेल्या कायद्यामध्ये सेवेतील किंवा सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची सोय लावण्यात आली. जलसंपत्ती नियमन प्राधिकरण तयार करण्यात आले तर त्यावर सुद्धा सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची सोय लावण्यात आली. अशी डझनावारी प्रकरणे नमूद करता येतील. कोणत्याही महामंडळावर किंवा प्राधिकरणावर अशा अधिकाऱ्यांची सोय लावण्याची संधी म्हणून पाहिले जाते.) अशा प्रकारच्या मागण्यांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयात फार वेगाने कार्यवाही होते, असे दिसून येते.

**१७.१०** न्यायाधिकरणाच्या स्थापनेच्या मागणीची पूर्तता करण्याच्या बाबतीत मंत्रालयातील अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेची संधी म्हणून त्याकडे पाहिले गेले व त्यामुळे या मागणीची पूर्तता त्वरेने झाली. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी उभयपक्षामध्ये मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले व पुढच्या अधिवेशनातच न्यायाधिकरणाची स्थापना करणारे विधेयक अतिशय तडफदारपणे सादर करण्यात आले. अधिकृतपणे "**महाविद्यालयीन न्यायाधिकरण**" (College Tribunal) स्थापन करणारे हे विधेयक तयार करीत असतांना उपसचिव किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची "प्रिसायडींग ऑफिसर" म्हणून सोय लावण्याची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली. फक्त सनदी अधिकाऱ्यांनाच "सेवेची संधी" उपलब्ध करून दिली तर "संधीची सेवा" करण्यासाठी पात्र असलेल्या समतूल्य वर्गामध्ये 'शोभा' होऊ नये म्हणून पाच वर्षाची सेवा झालेल्या प्राचार्यांना सुद्धा "प्रिसायडींग ऑफिसर" म्हणून जिल्हा न्यायाधिशापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या न्यायिक व्यक्तीच्या बरोबरीत आणून बसविण्यात आले.

**१७.११** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी न्यायाधिकरणाची जी कशीतरी "कुडमुडी व्यवस्था" महाराष्ट्रामध्ये स्थापन झाली तिच्यामध्ये आमूलाग्र सुधारणा करणारा एक निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९ जून १९८७ रोजी दिला. **खरे म्हणजे न्यायाधिकरणाच्या व्यवस्थेची फार मोठ्या प्रमाणात 'साफसफाई' करणारा निर्णय असेच या निर्णयाचे वर्णन करावे लागेल. क्रिष्णचंद्र शर्मा यांच्या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाचे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :-** "High Court of Bombay : Krishna Chandra Sharma vs Sind Hyderabad National Collegiate Board and others : Civil Reference No. 4 of 1984, 5, 6 of 1983, 5 of 1985, 2 of 1986 on 29 June 1987 : Hon'ble Judges : P.B. Sawant, G.H. Guttal : Case Type : Civil Reference : Final Decision : Delivered on 29th June 1987 : Reported : 1987 Mh. LJ 782"

**१७.१२ पीठासीन अधिकारी म्हणून प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक म्हणजे न्यायाधिकरणाची थट्टा करणे होय :** न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी म्हणून प्राचार्यांची नेमणूक किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करणारी कायद्याच्या कलम ४२ (ए) (३) च्या उपकलम (सी) आणि (डी) मधील तरतूद म्हणजे न्यायाधिकरणाच्या उद्दिष्टांची थट्टा करणे होय. मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या न्यायतत्वाचा विचार करता असे करणे संपूर्णपणे चुकीचे आहे. असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी नमूद केला. न्यायाधिकरणाला ही प्रकरणे न्यायतत्त्वानुसार (Judicially) निकालात काढावयाची असतात. या न्यायाधिकरणाला सिव्हिल प्रोसीजर कोडप्रमाणे अधिकार देण्यात आलेले असतात. प्राचार्य आणि सरकारी अधिकारी यांना न्यायिक प्रकरणे निकाली काढण्याचा कोणताही अनुभव नसतो असे स्पष्ट मत मा.न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये व्यक्त केलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"It is contended, and according to us rightly, that to impose persons mentioned in Clauses 42-A(3)(c) and (d) as presiding officers of the Tribunal **is to make a mockery of the object of constituting the Tribunal** and is also against the essence of the law laid down by the Supreme Court on the subject, The persons concerned are virtually from the executive branch of administration with no experience either of Court of law or of deciding matters otherwise judicially. The Tribunal is vested with the power to decide the disputes judicially and is vested with the same powers as are vested in an Appellate Court under the Code of Civil Procedure. The persons concerned will have no experience of Court procedure much less of the procedure under the Civil Procedure Code."

**१७.१३ शासकीय अधिकारी व प्राचार्य पीठासीन अधिकारी म्हणून नेमू नये :** मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या तत्त्वांचा विचार करता शासनाने प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या संवर्गातून पीठासीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करू नये असे स्पष्ट आदेश या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहेत. ते पुढील शब्दात :-

"In view of the law laid down by the Supreme Court, we will have to hold that the provisions of section 42-A(3)(c) and (d) are in breach of the law and therefore void. **The Government therefore shall not appoint any person from the categories** mentioned in sub-clauses (c) and (d) of section 42-A(3) to preside over the Tribunal."

**१७.१४ विद्यापीठाचा सल्ला अनावश्यक, मा.उच्च न्यायालयाशी सल्लामसलत आवश्यक :** विद्यापीठाशी सल्लामसलत करून या पीठासीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतच्या कायद्यातील तरतुदी ह्या न्यायिक तत्त्वाशी विसंगत आहेत. अशा प्रश्नावर सल्ला देण्यासाठी विद्यापीठ ही निश्चितच योग्य यंत्रणा नव्हे. पीठासीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतांना मा.उच्च न्यायालयाशी सल्लामसलत बंधनकारक असेल असेही या निर्णयात नमूद करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात:-

"We find that there is a good deal of substance in the grievance that University is hardly a body to tender advice on such appointments. In consonance with the view taken by a Division Bench of this Court in State of Maharashtra v. Labour Law Practitioner's Association, Tardeo, Bombay, 89 Bom.L.R. 120 and in view of the fact that the Tribunal so appointed is expected to work judicially, **the appointments to the Tribunal should be made by the State, Government in consultation with the High Court and not with the University which cannot be said to be a proper authority to give advice in such cases.** This is particularly so when we have held that no appointments to the Tribunal can be made from the categories of persons mentioned in section 42-A(3)(c) and (d)." आता तर २५ जुलै २०१३ च्या शासननिर्णयाने जी अर्धन्यायिक व्यथा निवारक यंत्रणा स्थापित केलेली आहे त्यामध्ये सर्व विद्यापीठांचे कुलगुरू सदस्य आहेत. ते कमी होतात म्हणून की काय अर्धा डझनाच्यावर सरकारी अधिकारी यंत्रणेवर नामित झालेले आहेत.

**१७.१५** न्यायाधिकरणाच्या ह्या तरतुदींच्या विरोधात संघटनेतर्फे अनेक निवेदने देण्यात आली, पण शेवटपर्यंत उच्च शिक्षण विभागाने मा.उच्च न्यायालयाचा उपरोक्त निर्णय झाल्यानंतर सुद्धा कोणतीही पावले दुरुस्तीसाठी उचलली नाहीत. शेवटी ही दुरुस्ती करण्याची पावले विधानमंडळाला उचलावी लागली. दिनांक १३ जुलै १९९२ रोजी सन १९९२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ विधानसभेमध्ये मांडण्यात आले. हे विधेयक दोनही सभागृहाच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविणारा प्रस्ताव विधानसभेने पाठविला होता. या प्रस्तावाला विधानपरिषदेची सहमती मिळाल्यानंतर हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. या समितीने याबाबतच्या शिफारशी केल्या. या समितीने तयार केलेले विधेयक विधानसभेने १८ जुलै १९९४ रोजी संमत केले व विधानपरिषदेने दिनांक २० जुलै १९९४ रोजी संमत केले. उभय सभागृहाच्या संमतीनंतर मा.राज्यपालांची या विधेयकाला दिनांक २१ जुलै १९९४ रोजी संमती मिळाली व त्याचे कायद्यामध्ये रूपांतर झाले. हाच सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ होय.

**१७.१६** राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला "There is no legally constituted machinery to redress the grievances..... It was agreed that this lacuna will be removed by a suitable amendment of the University Acts." असे आश्वासन लिखित स्वरूपामध्ये दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी दिले होते. कायद्यामध्ये ही suitable amendment करतांना अधिकाऱ्यांनी करून ठेवलेला घोळ निस्तरता निस्तरता जवळपास २० वर्षे निघून गेली व सन १९९४ मध्ये ह्या साऱ्या दुरुस्त्या शेवटी विधानमंडळाला कराव्या लागल्या. हा प्रकार झाला मा.मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याबाबतचा. खुद्द मा.उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी W.P.No.1326 of 2012 या प्रकरणात "The Grievance Redressal Body should be set up by 31st July 2013" असा आदेश दिला होता. त्याची अजूनही अंमलबजावणी झाली नाही. न्यायालयाने आदेश देऊन २० वर्षे झालेली नाहीत हे खरे असले तरी १० वर्षांचा काळ होऊन गेल्यानंतरसुद्धा अंमलबजावणी झाली नाही ही अत्यंत लज्जास्पद व न्यायालयाप्रती अनादराची भावना व्यक्त करणारी अकृति म्हणावी लागेल.

# (१८)

**१८.** "विद्यापीठे व महाविद्यालयातून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनप्रमाणे शिक्षकांची भरती करण्याबाबत विद्यापीठाने तातडीने कारवाई पूर्ण करावी" अशा सूचना शासनाने विद्यापीठांना ताबडतोबीने देण्याची आवश्यकता आहे. याचे कारण असे की, याबाबत उच्च शिक्षण विभागाने अत्यंत चुकीची भूमिका घेतलेली आहे. घटनेच्या कलम २५४ प्रमाणे, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३ मार्च २०२० रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे यूजीसी रेग्युलेशन २०१८ हे बंधनकारक आहेत ही गोष्ट आता निश्चित झालेली आहे. ती बाब महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी, मा.मुख्यमंत्र्यांनी व मंत्रीमंडळाने तसेच विधानमंडळानेसुद्धा मान्य केलेली आहे. उच्च शिक्षण विभाग ही गोष्ट (अनाकलनीय कारणाने) मान्य करायला तयार नाही, ही बाब मी संदर्भाधीन निवेदनाद्वारे आपल्या लक्षात आणून दिलेली आहे. तथापि, उच्च शिक्षण विभाग याबाबतीत काहीही कारवाई करायला तयार नसल्यामुळे घटनात्मकदृष्ट्या व कायदेशीरदृष्ट्या "विद्यापीठाने ही कारवाई तत्परतेने पूर्ण करावी." अशा सूचना आपण विद्यापीठांना द्याव्यात ही विनंती करण्यासाठी मी मुद्दाम उपरोक्त तपशील नमूद केलेले आहेत. भारतीय संविधानातील कलम २५४ अन्वये व सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली रेग्युलेशनची बंधनकारकता महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली असल्यामुळे रेग्युलेशनने जे काम करण्याची जबाबदारी उच्च शिक्षण विभागावर सोपविलेली नाही तिथे त्या विभागाने अनाकलनीय कारणासाठी धुडगूस घालू नये व विद्यापीठावर सोपविलेले काम विद्यापीठाने करू नये यासाठी विद्यापीठांवर दबाव टाकू नये याबाबत उच्च शिक्षण विभागाला सक्त सूचना देण्याची आवश्यकता आहे.

**१८.१** यूजीसी रेग्युलेशनने या संदर्भात उच्च शिक्षण विभागावर कोणतीही जबाबदारी सोपविलेली नाही. पण विनाकारणच उच्च शिक्षण विभाग विद्यापीठाला लेखी व तोंडी आदेश देऊन अडथळे आणत असल्याचे दिसून येते. उदाहरण म्हणून नमूद करावयाचे झाल्यास "अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य या पदांच्या निवडीकरिता गठीत करावयाची समिती" या विषयावर उच्च शिक्षण विभागाने दिनांक १ जानेवारी २०२४ रोजी काढलेल्या शासननिर्णयाचे (क्रमांक वेतन-२०१८/प्र.क्र.५६/विशि-१) *(167/2024)* देता येईल. वस्तुत अशी समिती गठित करण्याचा अधिकार रेग्युलेशनने उच्च शिक्षण विभागाला दिलेला नाही. ही समिती कशी असावी? हे रेग्युलेशननेच ठरवून दिलेले आहे व त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी संपूर्णपणे रेग्युलेशनने विद्यापीठावर सोपविलेली आहे. असे रेग्युलेशन निघाल्यापासून आतापर्यंत निरनिराळ्या सात अधिसूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांकडे अंमलबजावणीसाठी पाठविलेल्या आहेत व विद्यापीठाने त्याबाबतीत ताबडतोब कारवाई करावी असे नमूद केलेले आहे. यातील एकही अधिसूचना त्यांनी उच्च शिक्षण विभागाकडे पाठविलेली नाही कारण रेग्युलेशनने ही जबाबदारी उच्च शिक्षण विभागाकडे सोपविलेली नाही.

**१८.२** जवळ जवळ पाच वर्षापूर्वी **दिनांक ४ जून २०१९** रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने **"Guidelines for Recruitment of Faculty in Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities"** या विषयावर एक परिपत्रक निर्गमित केले असून नेमणूक करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना (Guidelines) सुद्धा या परिपत्रकासोबत पाठविलेल्या आहेत. या पत्राच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये **"Shortage of quality teaching faculty in Higher Education Institutions is a major concern and requires to be addressed immediately"** असे नमूद केले आहे. शेवटी या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे काटेकोरपणे कारवाई केली पाहिजे असे आदेशित केलेले आहे. ते पुढील शब्दात :-**"All the Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities are hereby requested that the enclosed Guidelines shall be adhered to in letter and spirit."** या मार्गदर्शक सूचनांच्या शेवटी विद्यापीठ अनुदान आयोगाने अत्यंत कठोर शब्दात इशारा दिलेला आहे. तो पुढीलप्रमाणे :-"Violations of the aforesaid Guidelines may lead to appropriate action by the UGC against the institutions including withholding the grants."

**(A)** या मार्गदर्शक सूचनांच्या उद्देशपत्रिकेमध्ये आम्ही कोणत्या अधिकारात ह्या सूचना निर्गमित करीत आहोत याचा स्पष्ट उल्लेख विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेला आहे. तो पुढील शब्दात:- **"The University Grants Commission (UGC) has the mandate to take steps for the promotion and co-ordination of university education and for**

**determination and maintenance of standards of teaching, examination and research in Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities (i.e. in Higher Educational Institutions or "HEIs")."**

**(B)** या मार्गदर्शक सूचनांच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये यूजीसी रेग्युलेशनचा उल्लेख नमूद आहे तो पुढीलप्रमाणे :- "(Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) **Regulations, 2018."** व दुसऱ्या परिच्छेदात याबाबतची माहिती ही पुढील शब्दात नमूद केलेली आहे. :- "HEIs should, however, ensure that all the vacant posts, along with the reservations details, are uploaded on the online portal <https://nherc.in>."

**१८.३** विद्यापीठ अनुदान आयोगाला घटनेने व कायद्याने दिलेल्या शक्तीचा वापर करून यूजीसीने आतापावेतो सात अधिसूचना विद्यापीठांसाठी दिलेल्या आहेत व त्यांचे पालन विद्यापीठांनी करावे असे त्यात नमूद आहे. या सात अधिसूचनांचे तपशील पुढीलप्रमाणे :-

**(1) Dated 4th June, 2019** Sub. : Guidelines for Recruitment of Faculty in Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities. D.O.No.F.1-14/20019(CPP-II) *(169/2024)*

**(2) Dated 31 July, 2019** Ref : Recruitment of Faculty in Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities.D.O.No.1-14/2019(CPP-II) *(171/2024)*

**(3) Dated 7 August, 2019** D.O.No.1-14/2019(CPP-II) *(171/2024)*

**(4) Dated 5th September, 2019** Subject : Recruitment of Faculty in Universities, Colleges and Institutions Deemed to be Universities. D.O.No.1-14/2019(CPP-II) *(171/2024)*

**(5) Dated 22nd October, 2019** Subject : Recruitment of Faculty in Universities, Institutions Deemed to be Universities and Colleges. D.O.No.1-14/2019(CPP-II) *(171/2024)*

**(6) Dated 26th November, 2021** Subject : Recruitment of Faculty in Universities, Institutions Deemed to be Universities and Colleges. D.O.No.1-14/2019(CPP-II) *(172/2024)*

**(7) Dated 16th July, 2024** Subject : Recruitment of Faculty in Universities, Institutions Deemed to be Universities and Colleges. D.O. No. 1-14/2019(CPP-II) (C.No.146777) *(172/2024)*

**१८.४** विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिक्षक भरतीच्या संदर्भात २०१८ च्या रेग्युलेशनने उच्च शिक्षण विभागाकडे कोणतीही जबाबदारी सोपविलेली नाही तरीही उच्च शिक्षण विभाग याबाबतच्या निर्णयावर मांडी घालून बसलेला आहे. ज्या विद्यापीठांवर याबाबतची जबाबदारी घटनेने, कायद्याने, रेग्युलेशनने सोपविलेली आहे त्या विद्यापीठांच्या उच्च शिक्षण विभागाने मुसक्या बांधलेल्या आहेत.

## (१९)

**१९.** घटनेतील व कायद्यातील तरतुदी लक्षात घेता मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत संचालक उच्च शिक्षण व सहसंचालक उच्च शिक्षण यांनी कशाप्रकारची कारवाई केली पाहिजे याबाबतीत राज्याच्या मुख्य सचिवांनी, विधी सचिवांनी, वित्त सचिवांनी दिलेल्या आदेशांची उच्च शिक्षण संचालक व त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्वच सहसंचालक अवहेलना करीत आहेत व त्यामुळे राज्यशासनावर लक्षावधी रुपयांचा अकारण भुर्दंड पडत आहे. ही गोष्ट तीव्र निषेधार्ह तर आहेच पण त्याचबरोबर शेकडो शिक्षकांना मनस्ताप देणारी व उच्च शिक्षण क्षेत्रातील असंतोष व अस्वस्थता वाढविणारी आहे. याबाबतचे तपशील मा.मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देणे मला आवश्यक वाटते.

**१९.१** एकदा मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला की त्याच्या अंमलबजावणीबाबत वेगवेगळ्या विभागांनी काय कृती करायला पाहिजे याबाबतचे स्थायी आदेश *(218/21)* राज्याच्या विधी विभागाच्या प्रधान सचिवांनी दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी एक परिपत्रक (No.: 820-2014/Misc./E Branch) काढून दिलेले आहेत. या परिपत्रकामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, मा.उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर आपण सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली की, उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता राहत नाही असा अनेक विभागांचा समज आहे. हा समज अत्यंत बेकायदेशीरपणाचा तसेच चुकीचा आहे. असे या परिपत्रकाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"It is noticed that there is a general perception that filing of appeal/SLP in the Hon'ble the Supreme Court against the judgment and order passed by the Hon'ble the High Court itself Would amount to stay to the execution/implementation of such judgment and order. **However, such perception is not legal, proper and correct."** *(218/21)*

**१९.२** सर्वोच्च न्यायालयात तुम्ही विशेष अनुमती याचिका (SLP) किंवा अपील दाखल केले असेल व सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली नसेल तर उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे कायद्याने तुम्हाला बंधनकारक असते असेही स्पष्टपणे याच परिपत्रकाच्या परिच्छेद दोनमध्ये पुढील शब्दात नमूद केलेले आहे. :-

"If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court. **The order against which no stay has been granted will have to be complied with/implemented** subject to the final decision of the Hon'ble the Supreme Court." *(218/21)*

**१९.३** मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या बावतीत वित्त सचिवांनी दिनांक २० ऑक्टोबर २०१४ रोजी एक परिपत्रक (क्रमांक : न्यायप्र २०१४/प्र.क्र. ८९६/प्रशा १) निर्गमित केले *(219/21)* व याबाबतचे स्थायी आदेश पारित केले. या परिपत्रकामध्ये स्पष्टपणे असे नमूद आहे की, **"न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अकारण अवमान याचिका दाखल होणार नाहीत."** वित्त विभागाने हे परिपत्रक मंत्रालयातील सर्व विभागांना पाठविलेले आहे.

**१९.४** खुद्द राज्याच्या मुख्य सचिवांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाच्या मार्फत आणखी एक परिपत्रक (क्रमांकःन्यायप्र २०१४/प्र.क्र.८९६/प्रशासन-१) निर्गमित केले. *(219/21)* या परिपत्रकाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, "उपरोक्त दिनांक २० ऑक्टोंबर,२०१४ च्या परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका/निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळविण्याबाबत तसेच **अवमान याचिकेसंदर्भात न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत."** *(219/21)* आणखी पुढे याच परिपत्रकात असेही नमूद करण्यात आले आहे की, "त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की,विभागांनी आपल्या अधिनस्त सर्व न्यायालयीन प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेऊन **न्यायालयीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.एखादे न्यायालयीन प्रकरण कार्यवाहीविना प्रलंबित राहिल्यास संबंधित कार्यासनाच्या कक्ष अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.**" *(219/21)*

**१९.५** मुख्य सचिवांचे, विधी सचिवांचे व वित्त सचिवांचे स्थायी आदेश असूनसुद्धा एखादी टोळधाड तुटून पडावी अशा आवेशात संचालक व सहसंचालक या आदेशांची अवहेलना करतात अशी डझनावारी उदाहरणे आहेत.

**१९.६** ही टोळधाड थोपविण्यासाठी त्यावेळच्या उच्च शिक्षण सचिवांना २०१४ मध्ये आदेश काढावे लागलेत. संचालक उच्च शिक्षण व त्यांच्या अधिपत्त्याखाली काम करणारे सहसंचालक हे किती गलथानपणे व बेजबाबदारीने काम करतात याबाबतीत उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी एक परिपत्रक *(220/21)* निर्गमित केले व त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. या परिपत्रकाच्या (क्र.न्यायप्र २०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि.-१) परिच्छेद 1 (vi) मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, :-

"(vi) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहीत मुदतीत अंमलबजावणी करणे**

अनिवार्य आहे." (2/15) **याच परिपत्रकामध्ये न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे सहसंचालकांवर टाकण्यात आलेली असून त्यांनी उगाच संचालकांकडे मार्गदर्शन मागू नये कारण संचालकांकडे तुम्ही मार्गदर्शन मागितले की, संचालक सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रकरण शासनाकडे पाठवितात. तेव्हा याबाबतची कार्यवाही ही सहसंचालकांनी करावी व याबाबतची माहिती शासनाकडे दाखल करण्यात यावी असेही या आदेशात नमूद आहे.**

इतकेच नव्हे तर सदरहू प्रकरणातील गलथानपणाबद्दल सहसंचालक व संचालक या दोघांनीही शासनाकडे खुलासा सादर करावा असेही आदेशित करण्यात आलेले आहे.

**१९.७** अनेक प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिले असून त्यातील सर्वोच्च न्यायालयाने स्थगनादेश न दिलेल्या निर्णयांची संख्या निरनिराळ्या प्रकरणात अर्धा डझनच्यावर जाते. पण एकाही सहसंचालकांनी त्यांची अंमलबजावणी आपल्या स्तरावर केल्याचे दिसून येत नाही. ते फक्त 'टपाल्या'चे काम करतात व संचालकांकडे मार्गदर्शन मागतात. संचालक हे मंत्रालयाकडे मार्गदर्शन मागतात. तिकडे उच्च शिक्षण विभागाचे सचिव - "तुम्हाला शासननिर्णय नीट वाचता येत नाही, उच्च न्यायालयाचा निर्णय नीट वाचता येत नाही. तुम्ही अकारण पत्रव्यवहार करता" - अशाप्रकारची दटावणी अनेक प्रकरणी संचालकांना देतात. पण हे संचालक व सहसंचालक दुरुस्त व्हायला तयार नाहीत.

**१९.८** संपूर्णपणे बेकायदेशीरपणे कापून घेतलेल्या ७१ दिवसाच्या वेतन कपातीबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिलेल्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्यामुळे वेळेच्या आत म्हणजे ३१ मार्च २०१९ पूर्वी त्या निर्णयाची अंमलबजावणी करून कापलेले १९१.८१ कोटी रूपये १२५१५ शिक्षकांना परत केले असते तर एक रुपयाचा भुर्दंड राज्यशासनाला सोसावा लागला नसता. पण त्या तारखेच्या आत अंमलबजावणी न केल्यामुळे ८ टक्के आणि १८ टक्के व्याजाच्या रक्कमेचा संचालक व सहसंचालकांच्या गलथान वर्तनामुळे व अकार्यक्षमतेमुळे फार मोठा भुर्दंड शासनाला सहन करावा लागत आहे. हे एक प्रकरण उदाहरण म्हणून दिलेले आहे. अशी अनेक प्रकरणे आहेत.

**१९.९** चार शिक्षकांनी या संदर्भात अवमान याचिका (C.P.No. 209 of 2020) मा.उच्च न्यायालयात दाखल केली. या चार शिक्षकांचे बेकायदेशीरपणे कापलेले ७,५६,२५५ रूपये न्यायालयाने ठरवून दिलेल्या मुदतीत त्यांना परत केले असते तर शासनावर एक रुपया भुर्दंड पडला नसता. तसे केले नाही. **या सहसंचालक व संचालक यांच्या गलथानपणामुळे व अकार्यक्षमतेमुळे या चार शिक्षकांना विलंबाबद्दल व्याज म्हणून १,८५,६६१ रुपये अदा करण्याची वेळ आली व अवमान याचिकेच्या रट्ट्यामुळे ते प्रत्यक्ष अदा करण्यात आलेले आहेत. आता चार शिक्षकांना एवढे रुपये तर १२५१५ शिक्षकांना व्याज म्हणून किती रक्कम द्यावी लागेल याची आकडेमोड कोणालाही करता येईल.**

**१९.१०** या चार शिक्षकांना दिले, बाकीच्यांना दिले नाही. हा भेदभाव का म्हणून? तर याचे उत्तर असे की, या चार शिक्षकांनी अवमान याचिका दाखल केल्या. इतर शिक्षकांच्या वतीने अवमान याचिका दाखल करण्याचा निर्णय संघटनांनी घेतलेला आहे. सारांश काय तर एका बाजूला शासनावर ५० ते ६० कोटी रुपयाचा भुर्दंड पडणार? तर दुसऱ्या बाजूला या शिक्षकांना अवमान याचिकेपोटी मोठा खर्च करावा लागणार. शासन व शिक्षक या दोनही पक्षांना हा भुर्दंड कशासाठी सहन करावा लागणार? तर संचालक व सहसंचालक यांच्या गलथानपणाची व अकार्यक्षमतेची किंमत म्हणून. मुख्य सचिवांचे आदेश त्यांच्या समोर आहेत, विधी सचिवांचे व वित्त सचिवांचे आदेश त्यांच्या समोर आहेत, उच्च शिक्षण विभागाचे सचिव त्यांना लेखी पत्राने कळवितात की, "आम्ही तुम्हाला शासननिर्णय काढून दिला आहे, तो तुम्हाला धड वाचता येत नाही व त्याची धड अंमलबजावणी करता येत नाही व अवमान याचिका दाखल झाल्या म्हणून उलट आमच्याशी पत्रव्यवहार करता. हे योग्य नाही. शासननिर्णयाप्रमाणे तुम्ही कार्यवाही करा." एवढी कानउघाडणी झाल्यानंतरसुद्धा उच्च शिक्षण संचालक व त्यांचे सहसंचालक धड कारवाई करीत नाहीत. हा एक मोठा निर्ढावलेपणा म्हणता येईल.

**१९.११** या संदर्भात आणखी एक अत्यंत लाजिरवाणा व ओंगळवाणा प्रकार उघडकीस आलेला आहे. एका सहसंचालकांनी दिनांक २१ नोव्हेंबर २०२१ रोजी मा.उच्च न्यायालयासमोर एक शपथपत्र दाखल केले व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे बेकायदेशीर वेतन कपातीच्या रकमा सदरहू शिक्षकांना परत करण्यास एवढा विलंब का होत आहे? याचे कारण नमूद करतांना मा.उच्च न्यायालयात पुढीलप्रमाणे म्हणणे सादर केलेले आहे.:-

"It is admitted that the delay as caused in the present petition, it is because the Government filed Review before Principal Bench of Hon'ble Bombay High Court and thereafter SLP before Hon'ble Supreme Court." (2/22) म्हणजे काय प्रकार आहे पहा. आम्ही मुंबई खंडपीठासमोर पुनर्विलोकन याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयासमोर विशेष अनुमती याचिका दाखल केली. त्यामुळे ह्या रकमा अदा करण्यास विलंब झाला अशी माहिती सहसंचालकांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली आहे. खरे म्हणजे "उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयातून स्थगनादेश मिळालेला नव्हता व त्यामुळे याबाबतीत आमच्या 'वाडवडिलां'च्या आदेशानुसार म्हणजे मुख्य सचिवांच्या, विधी सचिवांच्या, वित्त सचिवांच्या व उच्च शिक्षण सचिवांच्या आदेशाप्रमाणे ह्या रकमा आम्ही अदा करायला पाहिजे होत्या, त्या आम्ही केल्या नाहीत. हा आमचा मोठा गलथानपणा झाला, आमच्या या अकार्यक्षमतेमुळे राज्यशासनावर मोठा भुर्दंड पडला" असे शपथपत्र दाखल करण्या ऐवजी आम्ही पुनर्विलोकन याचिका व विशेष अनुमती याचिका दाखल केली होती असे कारण सहसंचालक पुढे करतात. हा फार मोठा निर्ढावलेपणा व निगरगट्टपणा होय.

**१९.१२** मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत मा.मुख्य सचिव, विधी सचिव, वित्त सचिव तसेच उच्च शिक्षण सचिव यांच्या स्थायी आदेशाचे पालन न केल्यामुळे अनेक प्रकरणात शासनाला लक्षावधी रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. काही प्रकरणी ही रक्कम कोट्यावधीत गेलेली आहे. "अशा प्रकरणाची चौकशी करून संचालक व सहसंचालक यांच्या पैकी जे कोणी अधिकारी या अपकृत्त्यास कारणीभूत असतील त्यांच्याकडून ही रक्कम व्यक्तिशः वसूल करण्यात येईल" असे आदेश काढण्याची आवश्यकता आहे.

**२०.** या सर्व बाबी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने जानेवारी २०२४ मध्ये एका तपशीलवार ठरावान्वये मा.उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिल्यात तरीही त्यावर उच्च शिक्षणमंत्र्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. ही अराजकता संपुष्टात यावी असे आज त्या विभागात कोणालाही वाटत नाही. म्हणून मी या पत्राद्वारे या सर्व बाबी आपल्या लक्षात आणून देत आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा करून आपण मार्ग काढावा व ही अराजकतेची स्थिती संपुष्टात आणावी अशी आपणास विनंती आहे.

आपला विनित,

**प्रा.बी.टी.देशमुख,**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**पत्राची प्रतिलिपी :** (१) श्री.देवेंद्रजी फडणवीस, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (२) श्री.अजितदादा पवार, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहितीसाठी व यथोचित कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 30.09.2024) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 30.09.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................